नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १०० * * अकोला * | सोमवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ | ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## पाकिस्तानचा कंधारमध्ये घातक ड्रोन हल्ला

■ वृत्तसंस्था, कंधार, दि. १२ :

पाकिस्तान आणि अफगाणिस्तानच्या सीमेवर तणाव वाढत आहे. अलिकडेच पाकिस्तानी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून अफगाणिस्तानने पाकिस्तानी सीमेवर हल्ला केला. या हल्ल्यात ५८ पाकिस्तानी सैनिक मारले गेल्याचा दावा केला जात आहे. या घटनेनंतर पाकिस्तानने प्रत्युत्तर देत अफगाणिस्तानचा हल्ला विनाकारण असल्याचे म्हटले आहे. प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने कंधारसह अफगाणिस्तानच्या अनेक भागात ड्रोन हल्ले सुरू केले आहेत. खरंच, अफगाणिस्तानच्या हल्ल्यानंतर पाकिस्तानी सैन्य अस्वस्थ झाले आहे. आता, पाकिस्तानने अफगाणिस्तानमधील नागरिकांना लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. पाकिस्तानने कंधारच्या निवासी भागात हवाई हल्ले केले आहेत.

अग्राग्रलेख

**खरीखरी..**

## स्मार्ट मीटरचा घोळ

काल आपल्या महाराष्ट्र सरकारने एक निवेदन प्रसृत केले. या निवेदनाप्रमाणे आता वीज ग्राहकांना विजेच्या उत्पादन किंमतीप्रमाणे विज बिल येणार आहे त्याचप्रमाणे भारतामध्ये सर्वत्र आता स्मार्ट मीटर बसवण्यात येणार आहेत. याचाच अर्थ असा की आता ते तथाकथित स्मार्ट मीटर जे बिल देतील त्याप्रमाणे तुम्हाला बिलाची रक्कम भरावी लागेल. आपल्या संपूर्ण देशात आणि त्याबरोबरच महाराष्ट्रात वीज बिलांचे खाजगीकरण होणार असून आता खाजगी कंपन्या हा कारभार सांभाळणार आहेत. या खाजगीकरणाच्या विरोधात महाराष्ट्रातील वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी तीन दिवसांचा संप पुकारला होता. परंतु सरकारने 'मेस्मा' कायद्याचा वापर करून या संपाला बेकायदेशीर घोषित केले. त्याचवेळी सरकारने या संपाविरोधात औद्योगिक न्यायालयातही याचिका दाखल केली होती. त्यावर निर्णय देताना माननीय न्यायालयाने संपाला बेकायदेशीर ठरवून कर्मचाऱ्यांनी ताबडतोब कामावर रुजू व्हावे असा आदेश दिला. त्या आदेशानुसार जवळजवळ ७० टक्के कर्मचारी कामावर रुजू झाले कर्मचारी संपावर असतानाही वीज वितरणाबाबत कुठेही फारशी अडचण आली नाही. हेही तितकेच खरे आहे मग आता प्रश्न असा आहे की, सरकारला अशा प्रकारच्या खाजगीकरणाची गरज का भासावी. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारतातील अनेक मोठमोठी शहरेही विजेपासून वंचित होती, तेव्हा अनेक नगरपालिका किंवा मोठमोठ्या ग्रामपंचायतीं मध्ये पेट्रोमॅक्सचे दिवे लावण्यात येत होते. आता आपल्या देशात विजेचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणात वाढलेले आहेत. अदानी सारख्या काही कंपन्या तर आपली वीज शेजारील राष्ट्रांना विकत आहेत म्हणजे वीज उत्पादनाच्या बाबतीत आपण जवळजवळ स्वयंपूर्ण आहोत. अशी परिस्थिती असतानाही आपल्या वीज वितरण कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांद्वारे सदरचे कार्य न करता ते काम आता बड्या बड्या खाजगी कंपन्या करणार आहेत. या निर्णयामुळे वीज उपभोक्त्यांना भविष्यकाळात मोठमोठ्या रकमेची वीज बिले येण्याची शक्यता आहे. देशातील चार-पाच राज्यांमध्ये संपूर्णपणे स्मार्ट मीटर बसवण्यात आलेले आहेत त्यामुळे तेथील उपभोक्त्यांना मोठमोठ्या रकमेची बिले येत असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. आपल्या महाराष्ट्रातही ज्यांनी ज्यांनी स्मार्ट मीटर बसवले आहेत त्यांचीही या मीटर बाबत तक्रार आहे. आतापर्यंत वीज वितरण कंपनीकडून ग्राहकांना बिल येत असे. ग्राहकाला जर जास्त बिल आले असे वाटले तर तपासणी करून योग्य कारण असल्यास दुरुस्ती करून घेता येत असे. मात्र आता खाजगी कंपन्यांद्वारे ग्राहकांना जी विजेची बिले येतील, त्यात काही दोष असल्यास त्याची तपासणी करून दाद कुणाकडे मागायची हा सुद्धा प्रश्न आहे? जी वीज वितरण कंपनी बिल देईल तिच्याकडेच दाद मागावी लागेल, यामध्ये तक्रार निवारण होऊन ग्राहकाला सवलत किंवा योग्य न्याय मिळेलच याची खात्री नाही. सध्या आपल्याला एका ठराविक दराने वीज मिळते त्यामध्ये कमी युनिटचा वापर करणाऱ्या ग्राहकांना सवलतीच्या दराने म्हणजेच कमी दराने वीज दिली जाते? आता स्मार्ट मीटर लावल्यावर कुणालाही अशी सवलत मिळेल की नाही हेच समजेनासे झालेले आहे. या नवीन स्मार्ट मीटरचा खाक्या थोडा वेगळाच राहणार आहे. सध्याच्या स्थितीमध्ये जे ठराविक दराने विजेचे बिल मिळते, त्याऐवजी स्मार्ट मीटरचे बिल कंपनीच्या फायद्याच्या प्रमाणेच मिळणार आहे. त्या स्मार्ट मीटरमध्ये अशी व्यवस्था आहे की एखाद्या भागामध्ये खूप जास्त तापमान असेल तर विजेचे दर जास्त राहणार आहेत. एखाद्या भागामध्ये जर विजेचा वापर जास्त होत असेल तरीही त्या ठिकाणी विजेच्या दरात वाढ होईल. खरंतर आत्तापर्यंत आपले मीटर वेगाने चालत असेल अशी शंका आली तर, एखादा हजार किलोवॅटचा बल्ब लावून एक युनिटसाठी किती वेळ लागतो हे आपल्याला तपासता येत असे. नवीन मीटर हा स्मार्ट मीटर असल्याने त्यामध्ये ती सोय राहणार नाही. यासाठी खाजगी कंपन्यांकडून कोण तपासणी करणार आहे, हे कुणालाही ठाऊक नाही कारण तुम्हाला जास्त दर लावणारेही तेच आहेत आणि तुमच्या तक्रारी ऐकून त्यावर निर्णय घेणारेही तेच आहेत. आतापर्यंत वेगवेगळ्या भागांमध्ये ट्रांसफार्मर म्हणजेच (विद्युतजनित्र द्वारे) विजेचे मोजमाप होत असे. त्या जनित्रामध्ये जेवढी वीज आली त्यापेक्षा कमी विजेचे बिल ग्राहकांकडून वसूल केले जात होते. कारण वीज आपल्या घरापर्यंत पोहोचताना त्यातील काही भाग विजेच्या वहनासाठी खर्च होत होता. त्याचा भुर्दंड ग्राहकांना भरावा लागत नसे. आता स्मार्ट मीटर मुळे कंपनीने किती वीज खरेदी केली. त्यातली तुम्ही किती वापरली आणि आणि वापरली असेल त्यापेक्षा जास्त बिले दिली, तरीही तुमच्या तक्रारीची दखल घेऊन त्याबद्दल कारवाई होणार नाही. आम्ही वर म्हटल्याप्रमाणे या विरोधात कर्मचाऱ्यांनी संप केल्यावर त्याला सरकारने कोणताही प्रतिसाद न दिल्याने संप गुंडाळावा लागला. या सर्व परिस्थितीमध्ये आता आपल्या जनतेने सध्याच्या वीज बिलापेक्षा दीडपट ते दुप्पट बिल आले तरी ते गुपचूप भरण्याची तयारी ठेवावी आणि स्वतःच्या कपाळावर हात मारून घ्यावा, एवढेच आपल्या हाती राहिलेले आहे. बाकी अदानी, टाटा पावर झिंदाबाद!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023




# दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे उद्घाटन

## शासन व न्याय व्यवस्था यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्नांना यश : सरन्यायाधीश भूषण गवई

■ महासागर प्रतिनिधी
दापोली, दि. १२ :

लोकशाहीने सर्वसामान्यांना बहाल केलेल्या न्याय, शासन, व प्रशासन या व्यवस्थांनी समन्वयाने काम केल्यास उत्तम काम उभे रहाते. बाबासाहेबांनी देशाला दिलेल्या संविधानामुळे आज देश विकासाचे मार्गावर कार्यरत आहे. शेजारील राष्ट्रांशी तुलना करता स्थिरपणे विकसीत राष्ट्राकडे प्रगती करीत असल्याचे प्रतिपादन देशाचे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भुषण गवई यांनी केले.



मंडणगड येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे नवीन इमारतीचे उद्घाटन न्यायालयाचे परिरसातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुणार्कृती पुतळ्याचे लोकार्पण सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. या कार्यक्रमाचे निमीत्ताने शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कुलचे मैदानात आयोजीत स्वागत व सत्कार समारंभात ते बोलत होते. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री उदय सामंत, गृहराज्य मंत्री योगेश कदम, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती चंद्रेशखर, न्यायमुर्ती, मंकरद कर्णीक, न्यायमुर्ती माधव जामदार, न्यायमुर्ती सुरेंद्र तावडे, जिल्ह्याचे प्रभारी न्यायाधीश विनोद जाधव, बार कौन्सील महाराष्ट्र व गोवाचे अध्यक्ष ॲड. अमोल सावंत मंडणगड दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या न्यायाधीश अमृता जोशी ॲड संग्राम देसाई, मंचावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना सरन्यायाधीश गवई म्हणाले, देशाचे सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश या भूमीकेतून मी अनेक न्यायालयांची उद्घाटने केलेली असली तरी कोल्हापूर येथील खंड पिठाचे उद्घाटन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुळ गाव असलेल्या मंडणगड तालुक्यातील न्यायालयाचे इमारतीचे हष्टीने आज करण्यात आलेले उद्घाटन हे माज्या कारकिदीर्तील अंत्यत महत्वाच्या घटना आहेत. तत्कालीन राष्ट्रपती रामनाख कोविंद यांच्यासमेवत बाबासाहेबांच्या मुळ गावास भेट दिली. त्यावेळी मंडणगड तालुक्याचे मुख्यालयी न्यायालय नाही हे बाब लक्षात आली. संविधानाचे निर्मीत्याचे मुळ गाव असलेल्या तालुक्यातच न्यायालय नाही ही बाब अस्वस्थ करणारी होती.

त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा न्यायमुर्ती या भूमीकेने राज्यशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला व न्यायालयाच्या इमारतीचे भूमीपूजन व लोकापर्णा करण्याचे भाग्य अपेक्षा नसताना मला मिळाले, असे ही गवई यांनी सांगितले. ते म्हणाले, राज्यशासन या कामी सकारात्मक राहीले याचबरोबर बांधकाम विभागानेही दोन वर्षे व चार दिवस इतक्या कमी कालावधीत ठरवून दिलेल्या कालमर्यादेत अतिशय गुणवत्तापुर्ण काम केले आहे. न्यायीक पायाभूत सुविधांचे निर्मीतीचे बाबतीत राज्यशासन गेल्या दहा वर्षापासून अतिशय आग्रही राहीले असून राज्यात विविध ठिकाणी उत्तम सोईसुविधा निर्माण केल्या आहेत. या संदर्भात होणाऱ्या टिकेला शासनाने पुर्ण देशात कुठल्याही तालुक्यात नाही असे सर्व सोईसुविधांनी युक्त न्यायालय मंडणगड सारख्या दुर्गम भागात उभे करुन आपली कार्यकुशलता सिध्द करत कामातून उत्तर दिले आहे.

### पायाभुत सुविधांच्या निर्मितीतून न्याय प्रणाली अधिक गतिमान करण्याचा प्रयत्न : मुख्यमंत्री फडणवीस

भारतीय संविधानाने दिलेला सर्वसामान्यांच्या कल्याणाचा विचार व त्यातील तत्वे वास्तवात आणण्याची जबाबदारी व्यवस्थेची असून सरकार शासनाची जबाबदारी पुर्ण करण्यासाठी कोठेही मागे हटणार नाही असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंडणगड येथे केले. मंडणगड येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे नवीन इमारतीचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमुर्ती भूषण गवई यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाचे निमीत्ताने शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कुलचे मैदानात आयोजीत स्वागत सत्कार समारंभास मुख्य अतिथी म्हणून फडणवीस यांची उपस्थिती लाभली.

## विद्यार्थिनीवर गँगरेप

### ३ आरोपींना अटक, २ फरार

■ वृत्तसंस्था,
कोलकाता, दि. १२ :

पश्चिम बंगालमधील दुर्गापुर येथे एका वैद्यकीय विद्यार्थिनीवर झालेल्या सामूहिक बलात्कार प्रकरणात पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. दोघे अजूनही फरार आहेत. ही घटना १० ऑक्टोबर रोजी रात्री ८ ते ९ च्या दरम्यान घडली. पीडिता तिच्या मित्रासोबत जेवण्यासाठी बाहेर गेली असताना तिच्यावर तीन तरुणांनी सामूहिक बलात्कार केला. कोलकातापासून १७० किमी अंतरावर असलेल्या दुर्गापुर येथील एका खाजगी वैद्यकीय महाविद्यालयासमोर ही घटना घडली. ओडिशातील एमबीबीएसच्या दुसऱ्या वर्षाची विद्यार्थिनी असलेली पीडिता सध्या एका खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी तिच्या मित्रासोबत जेवायला बाहेर गेली होती. कॅम्पसच्या गेटवर तीन तरुण उभे होते. त्यांनी पीडितेचा मोबाईल फोन हिसकावून घेतला आणि नंतर तिला केसांना धरून कॅम्पसच्या गेटसमोरील जंगलात ओढले. दरम्यान, पीडितेच्या मित्राने पळ काढला आणि पोलिसांना माहिती दिली. उपदंडाधिकारी आणि एसडीओ दुर्गापुर रंजना रॉय यांनी पीडितेची भेट घेतली. त्या म्हणाल्या, "विद्यार्थिनीची प्रकृती स्थिर आहे. तिची आई तिच्यासोबत आहे. पीडितेच्या पालकांनी मुलीच्या मित्रावर आणि त्याच्या मित्रांवर या घटनेत सहभागी असल्याचा आरोप केला आहे. पीडितेच्या मित्राला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली आहे.

## उत्तराखंडमध्ये तापाचा प्रकोप

### १५ दिवसांत १० जणांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, हरिद्वार, दि. १२ :

गेल्या काही दिवसांपासून उत्तराखंडमध्ये गूढ तापाचा प्रादुर्भाव सुरू आहे. अल्मोडा आणि हरिद्वारमध्ये १५ दिवसांत दहा जणांचा मृत्यू झाला आहे. गेल्या दोन आठवड्यात विषाणूजन्य तापामुळे अल्मोडा जिल्ह्यातील धौलादेवी ब्लॉकमध्ये किमान सात जणांचा मृत्यू झाला आहे, तर हरिद्वारमधील रुरकी येथे मृतांची संख्या तीन आहे. या आजाराबाबत जनतेत घबराट पसरली आहे. आरोग्य विभागाने दोन्ही जिल्ह्यांच्या मुख्य आरोग्य अधिकाऱ्यांना चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, अल्मोडा येथील धौलादेवी ब्लॉकमधील रुग्णांना प्लेटलेटची संख्या वेगाने कमी होत असताना आणि नंतर त्यांचा मृत्यू होत असल्याचे लक्षणांसह वारंवार रुग्णालयात दाखल केले जात आहे. यामुळे लोकांमध्ये घबराट पसरली आहे. शुक्रवारी ही ताजी घटना घडली, जेव्हा बिबाडी गावातील ७० वर्षीय गंगा दत्त जोशी यांचे उच्च तापाने निधन झाले.

## भारताचे ऑस्ट्रेलियासमोर ३३१ धावांचे लक्ष्य

■ वृत्तसंस्था, स्पोर्ट्स डेस्क, दि. १२ :



जर ऑस्ट्रेलियाला महिला एकदिवसीय विश्वचषकात भारताविरुद्ध विजय मिळवायचा असेल, तर त्यांना एकदिवसीय इतिहासातील सर्वात मोठे लक्ष्य गाठावे लागेल. रविवारी विशाखापट्टणममध्ये नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतीय महिला संघाने ३३० धावा करून सर्वबाद झाले. ऑस्ट्रेलियाने २ षटकांनंतर विनाविलंब १३ धावा केल्या आहेत. कर्णधार एलिसा हीली आणि फोबी लिचफिल्ड मैदानावर आहेत. भारताकडून अमनजोत कौरने पहिले षटक टाकले.

## मला पाडण्यासाठी भाजपने ५ कोटी देत पुतण्याला उभे केले

### आमदार धर्मराव बाबा आत्राम यांचा गंभीर आरोप



■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. १२ :

महाराष्ट्रात आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष आपापली रणनीती आखत असल्याचे दिसून येत आहे. त्यातच आता महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धर्मराव बाबा आत्राम यांनी भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. मला पाडण्यासाठी भाजपने ५ कोटी देऊन पुतण्याला डमी उमेदवार म्हणून उभे केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. गडचिरोली येथील अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धर्मराव बाबा आत्राम यांनी निवडणुकीच्या तोंडावरच भाजपवर गंभीर आरोप केले आहेत.

तुमच्या जुन्या बँक खात्यांमध्ये पैसे विसरला आहात का?



ते पुन्हा मिळवण्यासाठी आरबीआय तुम्हाला मदत करेल.

बँकेतील तुमच्या निष्क्रिय खात्यातील (2 वर्षांपेक्षा जास्त आणि 10 वर्षांपेक्षा कमी निष्क्रिय असलेले खाते) पैसे / दावा न केलेल्या ठेवीतील (10 वर्षांपेक्षा अधिक काळ) पैसे आरबीआयच्या डीईए निधीमध्ये हस्तांतरित केले जातात. तुम्ही किंवा तुमचा कायदेशीर वारस त्यावर कधीही दावा करू शकतो.

तुमच्या पैशांवर दावा करण्याच्या 3 सोप्या स्टेप्स

1. तुमच्या बँकेच्या कोणत्याही शाखेत भेट द्या, ती तुमची नेहमीची शाखा नसली तरीही चालेल.
2. केवायसी कागदपत्रांसह (आधार, पासपोर्ट, मतदाता ओळखपत्र, किंवा ड्रायविंग लायसन्स) फॉर्म सादर करा
3. पडताळणी केल्यानंतर, जर असतील तर पैसे व्याजासह परत मिळवा

तुम्ही दावा न केलेली रक्कम शोधण्यासाठी

तुमच्या बँकेची वेबसाइट शोधा किंवा आरबीआयचे UDGAM पोर्टल (https://udgam.rbi.org.in) पहा, ज्यात सध्या 30 बँका आहेत.

ऑक्टोबर ते डिसेंबर 2025 दरम्यान देशातील सर्व जिल्ह्यांमध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या दावा न केलेल्या संपत्तीच्या खास शिबिरांमध्ये भेट द्या




अधिक माहितीसाठी भेट द्या:
https://rbikehtahai.rbi.org.in
अभिप्राय देण्यासाठी इथे लिहा: rbikehtahai@rbi.org.in
क्यूआर कोड स्कॅन करा
अधिकृत व्हॉट्सॲप नंबर 99990 41935

जनहितार्थ जारी
भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

'हंबरडा' मोर्चा काढणाऱ्यांनी सत्तेत असताना काय केले?

# अजित पवार यांचा सवाल



**पुणे :** अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने काढलेल्या 'हंबरडा' मोर्चावरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता जोरदार टीका केली. सरकारच्या विरोधात मोर्चा काढणाऱ्यांनी आपण सत्तेत असताना शेतकऱ्यांसाठी नेमके काय केले, याचे आत्मपरीक्षण करावे, असा टोला त्यांनी लगावला. वडगाव येथील नवले लॉन्स येथे शनिवारी जनसंवाद कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्यापूर्वी अजित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. छत्रपती संभाजीनगर येथे ठाकरे गटाच्या वतीने आज उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली भव्य हंबरडा मोर्चा काढण्यात आला. हेक्टरी 50 हजार रुपये नुकसान भरपाई, सरसकट संपूर्ण कर्जमुक्ती, पीक विम्याचे निकष पूर्ववत करणे आणि घरे व पशुधनासाठी मदत निकष शिथिल करून तातडीने मदत देण्याची मागणी या मोर्चातून करण्यात आली. आता या मोर्चावरून राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उद्धव ठाकरे यांना नाव न घेता आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला दिला.

# जमीन मोजणी आता ३० दिवसांत

## ३.१२ कोटी प्रलंबित प्रकरणे मार्गी लागणार : चंद्रशेखर बावनकुळे

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :**

जमिनीच्या व्यवहारांसाठी सरकारी कार्यालयांच्या पायऱ्या झिजवणाऱ्या आणि भूमी अभिलेख विभागाच्या धीम्या गतीमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांसाठी अत्यंत दिलासादायक आणि क्रांतिकारी बातमी आहे! महसूल विभागाने जनहित साधणारा ऐतिहासिक निर्णय घेत, जमिनीच्या मोजणीचा निपटारा करण्यासाठी लागणारा १२० दिवसांचा दीर्घ कालावधी थेट केवळ ३० दिवसांवर आणला आहे.

राज्य सरकारने परवानाधारक खासगी भूमापकांची नियुक्ती करण्याची अधिसूचना जारी केली आहे. या निर्णयामुळे राज्यातील तब्बल ३ कोटी १२ लाख प्रलंबित मोजणी प्रकरणे वेगाने निकाली निघतील, असे



महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

शासकीय भूमापकांची संख्या अपुरी असल्याने हे काम तीन ते चार महिने लांबते. पण आता आता उच्च तांत्रिक पात्रता असलेल्या खासगी व्यक्तींना भूमापक म्हणून परवाना मिळणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात १५० खासगी भूमापकांची नियुक्ती करण्याचे उद्दिष्ट आहे. नवीन धोरणानुसार, खासगी भूमापक अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जलदगतीने जमिनीची मोजणी पूर्ण करतील. मात्र, खासगी भूमापकांनी केलेली मोजणी अंतिम नसेल. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, उपअधीक्षक भूमी अभिलेख किंवा नगर भूमापन अधिकारी यांसारखे सरकारी अधिकारी त्या मोजणीच्या कागदपत्रांची तपासणी करून त्यांना प्रमाणित करतील. पोटहिस्सा, हद्द कायम, बिनशेती, गुंठेवारी, वनहक्क दावे अशा सर्व प्रकारच्या अत्यावश्यक मोजणी प्रक्रिया आता जलदगतीने पूर्ण होणार आहे.

# राज ठाकरे सहकुटुंब 'मातोश्री'वर



**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :**

**राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण**

गेल्या काही दिवसांपासून ठाकरे बंधूंमधील भेटी गाठींचे प्रमाण वाढले असतानाच, मनसे प्रमुख राज ठाकरे हे आज पुन्हा 'मातोश्री' येथे दाखल झाले आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर ही भेट अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. कालच जैन मुनी नीलेशचंद्र यांनी पक्ष काढून मुंबई मनपाची निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केली आहे. यामुळे ठाकरे बंधू यांच्या आजच्या भेटीला महत्त्व आले आहे.

राज ठाकरे यांच्या या अचानक भेटीमुळे राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आले आहे. दोन्ही बंधूंमध्ये केवळ कौटुंबिक नव्हे, तर राजकीय मुद्द्यांवरही चर्चा होणार का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना पुन्हा एकत्र येऊन महापालिका निवडणुकांना सामोरे जाणार का, याबद्दल अटकळ बांधली जात आहे.

राज ठाकरे म्हणाले की, राज ठाकरे यांनी त्यांच्या आईसोबत उद्धव ठाकरे यांची भेट घेतली आहे. मी माझ्या कुटुंबासोबत आलो आहे. माझी आई माझ्यासोबत आहे. ही कौटुंबिक भेट आहे. राज ठाकरे यांच्या 'मातोश्री'वरील वाढलेल्या फेऱ्यांमुळे मनसे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गट एकत्र येणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. एकत्र राहण्यासाठी सोबत आलो आहोत, असे वक्तव्य उद्धव ठाकरेंनी केले होते. त्याशिवाय राज ठाकरेंनीही मराठीच्या मुद्द्यावर सर्व बाजूला ठेवून एकत्र यायला हवे, असे स्पष्ट केले होते. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत नवी युती होणार का? याबाबतची चर्चा सुरू झाली आहे. या भेटीत मुंबई मनपा आणि अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत चर्चा होण्याची दाट शक्यता आहे. काल जैन मुनी यांनी केलेल्या पक्षाच्या घोषणेनंतर आज ठाकरे बंधूंमध्ये काय चर्चा होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. 14 ऑक्टोबर रोजी मविआचे शिष्टमंडळ निवडणूक आयोगाची भेट घेणार आहे. अजून राज ठाकरे मविआत नसले तरीसुद्धा ते मविआच्या शिष्ट मंडळासोबत निवडणूक आयोगाची भेट घेणार असल्याने आता ठाकरे बंधूंच्या युतीवर एक प्रकारे शिक्कामोर्तब झाल्याची चर्चा सुरू आहे.

# भाजप काँग्रेसमय झाला

## जुना भाजप वेगळा होता : खासदार सुप्रिया सुळे



**पुणे :** भाजपमध्ये किती लोक मुळ भाजपचे राहिले आहेत. तुम्ही जर विधानसभेत गेलात ना तर आमदारांवर एक नजर टाका त्यांचे काँग्रेसी करण झाले आहे. भाजप विरोधी पक्षात असताना ज्यांनी आंदोलन केले लाठ्या खाल्या, सतरंज्या उचलल्या, ज्यांनी भाजपचा विचारांशी निष्ठावान राहिले ती लोक आज कुठे आहेत, असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, भाजप नेत्या सुषमा स्वराज यांनी मी गुरू मानते. जरी आमचे वैचारिक मतभेद असले तरी त्यांनी संसदेत अतिशय चांगले काम केले म्हणून मी त्यांना गुरू मानते. मी अनेक वेळा सांगितले की त्यांच्याकडून आम्ही कसे वागायचे हे शिकलो आहोत. जुना भाजपा आणि आजचा भाजप यामध्ये खूप मोठा फरक असल्याचे सुळे यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रात गुन्हेगारी वाढत आहे हे माध्यमांचा आणि सरकारचा डाटा सांगत आहे. पुणे जिल्ह्यात तर गुन्हेगारी घटनांमध्ये सर्वाधिक वाढ होत आहे. यात कोयता गँग, खून प्रकरण, चोरीच्या घटना वाढताना दिसून येत आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या संदर्भात रिपोर्ट येतच असतील मग नेमके या घटना का वाढत आहेत हा सवाल मुख्यमंत्री आणि गृहमंत्री असणाऱ्या देवेंद्र फडणवीसांना विचारावा लागेल,असे खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, राज्याची आर्थिक परिस्थिती ही अतिशय अडचणीत आहे. भारत सर्वाधिक कर्ज घेणारा देश आहे. राज्यातील मंत्री वारंवार आपल्या खात्याचा निधी वळवला असे सांगतात, कारण सरकारकडे पैसा नाही. ही परिस्थिती चिंताजनक आहे.

# तलाठ्याची तक्रार महसुलमंत्र्याकडे

**■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. १२ :**



राहुल विनायक आईलवार यांनी तलाठी कौसर खान यांच्यावर आरोप करत माझी शेती मौजा गडअहेरी येथे सर्व्हे नं. ८० क्षेत्र ४.०५ हे. आर. असून सदर सर्व्हे नं. च्या पश्चिमेला ५०० मीटर वर प्राणहिता नदी वाहत असून दक्षिणेकडे गडअहेरी नाला वाहत आहे. सदर क्षेत्रात भात रोवणी केली असून ते नकाशात स्पष्ट दिसत आहे आणि जून-ऑक्टोबर २०२५ मध्ये आलेल्या अतिवृष्टी व पुरामुळे संपूर्ण क्षेत्र पाण्याने भरलेले असून भात पिकाची नासाडी झालेली आहे.

सर्व्हे नं. ८० क्षेत्र ४.०५ हे. आर. अतिवृष्टी व पुराच्या पाण्याने भरलेले असतांना अहेरी तलाठी कौसर खान हे घरी बसून खोटा पंचनामा करुन शासनाला खोटा अहवाल सदर केला त्यांनी सादर केलेल्या यादीतील काही लाभार्थी जसे सर्व्हे नं. १५८ क्षेत्र ४.८६ हे. आर. इतके असून त्यापैकी क्षेत्र २.०० हे. आर. मध्ये कापूस पेरणी केल्याचे दाखविण्यात आले परंतु सदर ७/१२ वर खसरामध्ये सन २०२५-२६ मध्ये ४.८६ क्षेत्रात भात पेरणी केल्याचे दर्शविलेले आहे असे आरोप करत सांगितले की, अतिवृष्टी व पुरामुळे बाधीत शेतकऱ्यांचे नाव नागेश लक्ष्मण तोर्रेम, चेरपल्ली सर्व्हे नं. ३७ क्षेत्र २.९४ हे. आर. इतके असून त्यापैकी क्षेत्र १.५० हे. आर. जागेवर कापूस पेरणी केल्याचे दाखविण्यात आलेले आहे. परंतु सदर क्षेत्राच्या ७/१२ वर खसरामध्ये सन २०२५-२६ मध्ये संपूर्ण क्षेत्रात २.९४ हे. आर. वर भात पेरणी केल्याचे दर्शविण्यात आलेले आहे

तसेच गडअहेरी सर्व्हे नं. ८० क्षेत्र ४.०५ पासून पूर्वेकडे १००० मीटर अंतरावर सर्व्हे नं. १५८ असून व दक्षिणेला सर्व्हे नं. ३७ हे ५०० मीटर अंतरावर असून (सदर क्षेत्र उंच भागावर) सदर क्षेत्र पाण्याने व्यापलेले नसतांना सुध्दा त्यांच्याकडून रक्कम घेऊन खोटा पंचनामा करुन शासनाला खोटा अहवाल सादर केलेला आहे. व माझे क्षेत्र नदी व नाल्याला लागून असतांना अतिवृष्टी व पुराच्या पाण्याने व्यापलेले असून सुध्दा तलाठी कौसर खान पंचनामा केलेला नाही.असे आरोप करत तलाठी कौसर खान यांनी घरी बसून सदर शेतीचा खोटा पंचनामा करुन शासनाला खोटा अहवाल सादर केला असे आरोप करत मा. ना. चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब, महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई झ ३२ यांना पत्राद्वारे माहिती दिली व कौसर खान यांच्याकडे दि. २९/०८/२०२५ रोजी माझ्या आईच्या निधनानंतर वारसान फेरफार करण्याकरीता अर्ज सादर करण्यात आला परंतु अजूनपर्यंत फेरफार घेण्यात आलेली नाही तरी शासनाकडून अतिवृष्टी व पुराने बाधीत झालेल्या क्षेत्राचा पंचनामा करुन नुकसान भरपाई देण्यात यावी व वारसान फेरफार तात्काळ करण्यात यावी.

तसे न केल्यास मी व माझ्या कुंटूंबासह दि. १०/११/२०२५ पासून तहसिल कार्यालय, अहेरी जि. गडचिरोली समोर आमरण उपोषणास बसणार आहे. उपोषण काळामध्ये मला किंवा माझ्या कुंटूंबाला काही कमी जास्त झाल्यास सर्वस्वी शासन जबाबदार राहील. असे निर्देशही दिले यावर चंद्रशेखरजी बावनकुळे महसुल मंत्री काय निर्णय घेतील याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. व आमरण उपोषणाचे निर्देश दिल्यामुडे महसूल विभागाचे वातावरण तापले आहे.

# कॅनव्हासवर अवतरल्या भारतीय संस्कृतीच्या कलाकृती

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :**

काय सुंदर पेंटिंग आहे!, अरे या अजिंठाच्या लेणी बघ...हुबेहूब वाटतायत ना! अशा प्रकारच्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया कॅनव्हासवर अवतरलेल्या चित्रांना मिळत होत्या. निमित्त होते, नेहरू सेंटर येथे भरलेल्या मुंबई आर्ट फेअरचे! या चित्र महोत्सवात देशातील अडीचशेहून अधिक कलाकारांनी 3000 कलाकृतींद्वारे आपली कला सादर केली आहे. त्यांच्या या कलांमध्ये मूर्त-अमूर्त कलासंगम पाहायला मिळत आहे. मुंबई आर्ट फेअरच्या सहाव्या पर्वात प्रस्थापित कलाकारांपासून ते उदयोन्मुख कलाकारांपर्यंत तसेच कोल्हापूर, जळगांव, लातूरपासून ते लडाख- कन्याकुमारीपर्यंतच्या कलाकारांच्या कलाकृती पाहायला मिळतात.

# १२ वर्षांच्या अदितीची नासा दौऱ्यासाठी निवड

**■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १२ :**

अमेरिकेतील जगविख्यात अवकाश संशोधन संस्था नासाबद्दल अनेकांना कुतुहल वाटत असतं. पुण्याच्या भोर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या शाळेत (झेडपी) शिकणाऱ्या १२ वर्षांच्या अदिती पाठेची नासाच्या दौऱ्यासाठी निवड झाली आहे. अदिती पाठेचं कुटुंबिय अतिशय बिकट परिस्थितीतून वाट काढत तिचे शिक्षण करत आहेत. तिचे वडील हमालीचे काम करतात, घरात कुणाकडेही स्मार्टफोन नाही. अदितीने कधी ट्रेननेही प्रवास केलेला नाही. अशात आता ती थेट अमेरिकेचा दौरा करणार असल्यामुळे तिच्या पालकांसह जिल्हा परिषदेच्या शाळेलाही आनंद पारावर उरला नाही.

निगुडघर येथील झेडपीच्या शाळेत जाण्यासाठी अदिती रोज सकाळी पायी ३.५




किमींचा प्रवास करते. सायंकाळी ५ वाजता शाळा सुटल्यानंतर पुन्हा तासभर पायी चालून घरी येते. अदितीचे वडील पुण्याच्या मार्केट यार्डात हमालीचे काम करतात. तर आई गावाला राहते. भोर तालुक्यात मावशीच्या घरी राहून अदिती शिक्षण घेत आहे.

अदितीच्या मुख्याध्यापकांनी जेव्हा तिला ही बातमी दिली तेव्हा तिच्या डोळ्यात अश्रू आले. माझ्या मावशीला ही बातमी सांगितल्यानंतर तिला काय बोलावे हे कळत नव्हते. मी आईला सकाळी फोन करून सांगितले की, मी अमेरिकेला जाणार आहे.

अदितीची मावशी मंगल कंक यांनी सांगितले की, आम्ही लहानपणापासून अदितीला वाढवले. आमच्यापैकी कुणीही विमानही पाहिलेले नाही. आता अदिती एकट्याने एवढ्या लांब विमानातून प्रवास करणार आहे. आमच्यासाठी ही अभिमानाची बाब आहे. आमच्या गावात अनेक लोक हमालीचे काम करतात. जर शिक्षण घेतले नाही तर हमाली करण्याशिवाय पर्याय उरत नाही. त्यामुळे मुलांनी शिकून मोठे व्हावे, एवढेच स्वप्न आम्ही पाहतो.

निवडणूक आयोगाच्या भेटीसाठी तुम्हीही सोबत यावे

# संजय राऊतांचे मुख्यमंत्र्यांना आवाहन



**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये घोटाळे होण्याची शक्यता आणि निवडणूक प्रक्रियेतील आक्षेपांवर चर्चा करण्यासाठी महाविकास आघाडीचे (मविआ) सर्वपक्षीय शिष्टमंडळ लवकरच निवडणूक आयोगाची भेट घेणार आहे. आमच्यासोबत महायुती सरकारमधील नेत्यांनी देखील निवडणूक आयोगाची भेट घेण्यासाठी यावे, असे आवाहन संजय राऊत यांनी केले. तसेच अजित पवार यांनी बारामतीत जिंकण्यासाठी घोटाळे केल्याचा आरोप संजय राऊतांनी केला. म्हणाले, निवडणूक आयोग आणि निवडणूक प्रक्रियेसंदर्भात सगळ्यांचेच काही आक्षेप आहेत. काही मतदारसंघात भाजपचे सुद्धा आक्षेप आहेत. स्वतः नितीन गडकरी यांचे काही आक्षेप होते. कामठी, राजुरा यांसारख्या भाजपच्या मतदारसंघामध्ये कसले घोटाळे झालेत, यासंदर्भात काही संशय आणि आरोप झालेले आहेत. त्यामुळे आम्ही मुख्यमंत्र्यांना आवाहन केले की, तुम्ही मुख्यमंत्री म्हणून न येता तुमच्या पक्षाचे प्रतिनिधी म्हणून तुमच्या सरकारमधील दोन इतर सहकाऱ्यांसोबत या सर्व पक्षीय शिष्टमंडळात सहभागी व्हा आणि निवडणूक आयोगाकडे आम्ही करणाऱ्या चर्चेमध्ये सहभागी व्हा. ही आमची स्पष्ट भूमिका आणि कर्तव्य आहे, असे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत म्हणालेत. मी निवडणूक आयोगाच्या भेटीला जाईल, असे वाटते का? असे अजित पवार म्हणतात, कारण त्यांनी बारामतीत निवडणुका जिंकण्यासाठी घोटाळेच केलेले आहेत. तो मुद्दा समोर येऊ शकतो.

# वीट पडून २२ वर्षीय तरुणी मृत्यू प्रकरणी दोन अभियंत्यांना अटक

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १२ :**

जोगेश्वरी मध्ये बांधकाम सुरू असेलल्या इमारतीमधून सिमेंटची वीट पडून खालून जाणार्या २२ वर्षीय तरूणीचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेप्रकरणी मेघवाडी पोलिसांनी संबंधित इमारतीच्या दोन अभियंत्यांना अटक केली आहे. सुरक्षेच्या नियमांचे पालन न केल्याचे ठपका ठेवून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात आणखी अटक होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. या घटनेमुळे स्थानिकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे.

संस्कृती अमीन (२२) ही तरूणी जोगेश्वरी पूर्वेच्या मजासवाडी येथे आई वडिलांसह रहात होती. तिच्या वडिलांचा कॅटरिंगचा व्यवसाय आहे. संस्कृती हिने हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स पूर्ण केला होता. नुकतीच ती एका खासगी बॅंकेत कामाला लागली होती.

दादा तुम्हाला पैशांचे सोंग जमत नसेल तर खुर्ची सोडा

# बच्चू कडूंची अजित पवारांवर टीका

**■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १२ :**



वित्त खाते तुमच्याजवळ असताना तुम्ही म्हणता पैशांचे सोंग जमत नाही. पैशांचे सोंग जमात नसेल तर खुर्ची सोडा, असे म्हणत प्रहार संघटनेचे बच्चू कडू यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांवर सडकून टीका केली आहे. इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथे आज शेतकरी कर्जमुक्ती एल्गार सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत बच्चू कडू यांनी अजित पवार तसेच कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यावर टीका केली आहे.

बच्चू कडू म्हणाले, सकाळी 7 वाजता उठून तुम्ही शपथ घेतली. एवढे सोंग कोणाला जमले का दादा, कुठे गेली तुमची दादागिरी? वित्त खाते तुमच्याजवळ असताना तुम्ही म्हणता पैशांचे सोंग जमत नाही. जमत नसेल तर आम्हाला सांगा! मी सांगतो कसे सोंग करायचे. शक्तिपीठ महामागार्साठी 85 हजार कोटी तुमच्या निधीतून दिले. आम्ही रस्त्यातील खड्डयाने मरतोय. दादा हे सोंग कसे जमले तुम्हाला? कोणाच्या खिशातून पैसा काढला तुम्ही? किती लुटले ते आम्हाला सांगा. माझा शेतकरी पाय घासून मरतोय त्यासाठी पैसा नाही. तिथे तुम्हाला पैशांचे सोंग जमत नसेल तर खुर्ची सोडा, अशी टीका कडू यांनी केली आहे.

बच्चू कडू यांनी यावेळी बोलताना अजित पवारांचे मागील काही वादग्रस्त वक्तव्यांचा दाखला देत टीका केली. मागे एकदा अजित पवार म्हणाले होते पाणी नाही तर, धरणात ७७७ का? या विधानावर भाष्य करत टीका करताना बच्चू कडू म्हणाले, खरोखरच ७७७ तर वाहत जाईल दादा, सापडणार ही नाहीत कोणत्या नदीत गेले, समुद्रात गेले, डोहात गेले तर, असे म्हणत कडू यांनी पवारांवर जहरी टीका केली.

पुढे बोलताना बच्चू कडू यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यावर देखील निशाणा साधला आहे. ते म्हणाले, कृषिमंत्री शेतकऱ्यांसाठी भांडताना दिसला पाहिजे. नुसता शेपूट हलवणारा नकोय आम्हाला. मागे माणिकराव कोकाटे कृषिमंत्री होते. भरणे थोडे बरे बोलतात, कमीत कमी ते चुका तरी करत नाहीत.

# बीड कारागृहात धर्मांतरासाठी मारहाण

**■ महासागर प्रतिनिधी, बीड, दि. १२ :**

बीड कारागृहातून जामिनावर बाहेर आलेल्या एका कैद्याने शुक्रवारी आरोप केला की, पेट्रस गायकवाड यांनी त्याला व इतर कैद्यांना धर्मांतर करण्यासाठी मारहाण केली. पैशांचे आमिष दाखवले. गुन्ह्यातून मुक्त करण्याचे आश्वासन दिले. कारागृहातील कीर्तन, भजन, नमाज या प्रार्थना बंद केल्या गेल्या आहेत, असाही आरोप केला. यापूर्वी जळगावात अधीक्षक असताना एका कैद्याचा मृत्यू झाला होता. त्या कैद्याच्या पत्नीनेही आरोप केला की, धर्मांतरासाठीच मारहाण केल्याने पतीचा मृत्यू झाला. पेट्रस गायकवाड हे केस मागे घेण्यासाठी आमिष दाखवत आहेत असा आरोप केला.

कारागृह अधीक्षक पेट्रस गायकवाड यांच्या विरोधात शनिवारी बीड कारागृहातून खुनाच्या गुन्ह्यात जामीन मिळालेला कैदी कल्याण भावले व जळगाव येथील मीना रवींद्र जगताप यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. या वेळी दोघांनी गायकवाड यांच्यावर गंभीर आरोप केले. कल्याण भावले म्हणाले, मी 1 वर्षांपासून कारागृहात आहे. गायकवाड आल्यानंतर त्यांनी कारागृहातील भजन, नमाज बंद केले आहेत. धर्मांतरासाठी दबाव टाकला जात आहे. विरोधात बोलणाऱ्या कैद्यांना जेवण दिले जात नसल्याचाही आरोप केला आहे. कारागृह अधीक्षक पेट्रस गायकवाडयांच्यावर सातत्याने आरोप होत आहेत. मात्र त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया अथवा खुलासा दिला नाही. संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

# माजी आमदार भाऊराव गोरेगावकर यांचा शिंदेसेनेत प्रवेश निश्चित



**■ महासागर प्रतिनिधी हिंगोली, दि. १२ :**

**मंगळवारी मुंबईत होणार पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम**

हिंगोली विधानसभेचे तीन वेळा प्रतिनिधीत्व करणाऱ्या काँग्रेसचे माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर यांचा शिंदे सेनेत प्रवेश निश्चित झाला असून मंगळवारी ता. १४ मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमदार संतोष बांगर यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश होणार आहे.

हिंगोली विधानसभेचे तीन वेळा प्रतिनिधीत्व केलेल्या माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी काँग्रेसच्या अंतर्गत वादाला कंटाळले होते. कुठल्याही कार्यक्रमाबाबत पक्षाकडून स्पष्ट भुमिका घेतली जात नव्हती. तर हिंगोली विधानसभेची जागा काँग्रेसची असतानाही ऐनवेळी हि जागा ठाकरे गटाला सोडण्यात आली होती. त्यामुळे माजी आमदार गोरेगावकर यांनी उघड नाराजी व्यक्त करून अपक्ष म्हणून निवडणुक लढविली होती.

दरम्यान, मागील काही दिवसांपासून शिंदेसेनेचे आमदार संतोष बांगर यांनी माजी आमदार गोरेगावकर यांच्या गाठीभेटी वाढल्या होत्या. त्यामुळे गोरेगावकर हे शिंदे सेनेत प्रवेश करतील हे स्पष्ट होऊ लागले होते. मात्र आपण कार्यकर्त्यांशी चर्चा केल्या शिवाय कुठलीही भुमीका घेणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले होते. त्यानंतर आज रविवारी ता. १२ त्यांनी गोरेगाव येथे कार्यकर्त्यांची बैठक घेतली. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुनील पाटील गोरेगावकर, माजी सभापती संजय उर्फ भैय्या देशमुख, द्वारकादास सारडा, रुपाजी पाटील, बालाजी गावंडे. रणजीत भैय्या गोरेगावकर, मदन शेळके, वरुण गोरेगावकर यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी माजी आमदार गोरेगावकर यांनी शिंदेसेनेच प्रवेशाचा मुद्दा मांडला. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या भुमीकेशी सहमत असल्याचे स्पष्ट केले.

# ट्रकखाली चिरडून चिमुकलीचा मृत्यू

**■ महासागर प्रतिनिधी, सातपूर, दि. १२ :**

आजीबरोबर दुचाकीने घराकडे जात असलेल्या नातीचा ट्रकखाली सापडून अंत झाला. पाइपलाइन रोडवरील पेट्रोलपंपासमोर शनिवारी (दि. ११) सकाळी पावणेदहाच्या सुमारास ही घटना घडली. गुरुवारीच (दि. ९) गणेशनगरच्या नागरिकांनी अधिकाऱ्यांना येथील मैदानात बोलावत या रस्त्यावर स्पीडब्रेकर बसवावे अशी मागणी केली होती. मात्र, अधिकाऱ्यांनी ती केवळ ऐकली आणि निघून गेल्याने अधिकाऱ्यांवर संताप व्यक्त आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निविका अभिषेक नेरकर (८, रा. राधावल्लभ बंगला, श्री गुरुजी रुग्णालयामागे, पाइपलाइनरोड) ही तिची आजी पुष्पा नेरकर (६०) यांच्याबरोबर स्वीमिंगला जात होती. मात्र, तो ड्रेस फाटल्याचे लक्षात आल्याने त्यांनी स्वीमिंगला जाणे रद्द केले आणि निवेकजवळच्या पंपावर दुचाकी (एमएच १५ जे ९१८१) यात पेट्रोल भरले. तेथून घराकडे जात असताना गणेशनगर पाटीजवळून जात असताना भरधाव ट्रकने (एमएच १७ बीडी ५००५) त्यांच्या दुचाकीला कट मारला. त्यावेळी आजीचा वाहनावरील तोल सुटला. त्या रस्त्याच्या डावीकडे तर निविका उजवीकडे पडली आणि ट्रकच्या मागील चाकाखाली चिरडली.

कोल्हापूरातील आमदाराला 'हनी ट्रॅप'मध्ये फसवण्याचा प्रयत्न

# अश्लील चॅट, फोटो पाठवून १० लाखांची मागणी

**■ महासागर प्रतिनिधी, कोल्हापूर, दि. १२ :**

राज्याच्या राजकारणात खळबळ माजवणारी एक धक्कादायक घटना कोल्हापुरात समोर आली आहे. चंदगड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजी पाटील यांना 'हनी ट्रॅप'मध्ये फसवून त्यांची बदनामी करण्याची आणि पैसे उकळण्याची धमकी देण्यात आल्याचा प्रकार उघड झाला आहे. एका महिलेने अश्लील मेसेज, फोटो आणि व्हिडिओ पाठवून झालेल्या संभाषणाच्या आधारावर आमदारांकडे दहा लाख रुपयांची मागणी केल्याचा दावा करण्यात आला आहे.

चंदगडचे आमदार शिवाजी पाटील यांना वर्षभरापासून अश्लील मेसेज, फोटो आणि व्हिडिओ पाठवून त्रास दिला जात होता. या त्रासाला कंटाळून आमदार पाटील यांनी अखेर 8 ऑक्टोबर रोजी ठाण्यातील चितळसर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यानंतर कोल्हापूर आणि ठाणे पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली आणि या प्रकरणात चंदगड तालुक्यातील मांडेदुर्ग गावातील बहीण-भावाला अटक केली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये मांडेदुर्ग येथील मोहन जोतिबा पवार आणि त्याची बहीण शामल पवार यांचा समावेश आहे. या दोघांनी मिळून वेगवेगळ्या मोबाईल क्रमांकावरून आमदार शिवाजी पाटील यांना अश्लील चॅट, फोटो आणि धमकीचे मेसेज पाठवले, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, बहीण-भावाने सुरुवातीला आमदारांसोबत मैत्री करण्याची इच्छा व्यक्त केली आणि चॅटिंग सुरू केले. यानंतर त्यांची राजकीय प्रतिमा मलिन करण्याची धमकी देत दोन-तीन वेळा मिळून एकूण 10 लाख रुपयांची मागणी करण्यात आली. आमदारांनी सुरुवातीला हे त्रासदायक मेसेज आणि नंबर ब्लॉक केले, तरीही आरोपींनी नवनवीन नंबर वापरून आपला त्रास देणे सुरूच ठेवले.

या प्रकारानंतर आमदार पाटील यांनी हा 'हनी ट्रॅप' नसून, राजकीय दडपशाहीचा प्रयत्न असल्याचा दावा पत्रकारांशी बोलताना केला होता. दरम्यान, पोलिसांनी गुन्हा दाखल करून तातडीने तपास सुरू केल्याने या प्रकरणातील आरोपींना अटक करणे शक्य झाले. पोलिस या प्रकरणात अधिकचा तपास करत आहेत.

# महासागर अकोला

●सोमवार,दि.१३ ऑक्टोबर २०२५

पान ६


## परदेश शिष्यवृत्तीसाठी २४ ऑक्टोबरपर्यंत ऑनलाइन अज

**अकोला:** केंद्र सरकार पुरस्कृत नॅशनल ओव्हरसीज स्कॉलरशीपयोजनेसाठी २०२५-२६ या वर्षांसाठी अर्ज करण्याची दुसऱ्याफेरीची प्रक्रिया सुरू झाली आहे.सामाजिक न्याय व अधिकारितामंत्रालय, दिल्ली यांच्याकडून अर्ज मागवले असून, पात्र विद्यार्थी, लाभार्थी यांनी २४ ऑक्टोबरपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करावेत.

## शहरात डासांचा हाय अलर्ट;अकोलेकरांचे आरोग्य धोक्यात

**अकोला,दि.१२ (प्रतिनिधी) :**

शहरात डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असून अकोलेकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे. महापालिका वैद्यकीय आरोग्य विभागाच्या अंतर्गत मलेरिया विभाग अस्तित्वात असतानाही डासांना आळा घालण्यासाठी कुठल्याही उपाययोजना होताना दिसत नाहीत. कागदोपत्री कार्यवाही केली जात असून प्रत्यक्षात शहरात कीटकनाशक फवारणी केली जात नसल्याची गंभीर परिस्थिती आहे. परिणामी, डासांमूळे केवळ आजार बळावण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

रात्री थंडी आणि दिवसा ऊन असे विचित्र वातावरण तयार झाले आहे, ज्यामुळे डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शहराच्या झोपडपट्टी भागात (स्लम भागात ) तसेच ज्या परिसरात सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था नाही, त्या वस्त्यांमध्ये डासांची संख्या लक्षणीय वाढली आहे. महापालिकेच्या मलेरिया विभागात डासांना आळा घालण्यासाठीचार फॉगिंग मशीन तसेच ४६ कीटकनाशक फवारणीसाठी हातपंप उपलब्ध आहेत.

तसेच, फवारणीसाठी वापरले जाणारे टेलीफॉस औषधही उपलब्ध आहे, असे असतानाही शहरात कुठेही याचा वापर होताना दिसत नाही. मलेरिया विभागात केवळ कागदोपत्री कार्यवाही सुरू असल्याचे वास्तव आहे. सर्व्हिस लाईन, सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था नसणाऱ्या वस्त्या आणि मोर्णा नदी काठावरील परिसरात कीटकनाशक फवारणीची नितांत गरज असतानाही मलेरिया विभागाच्या उपाययोजना शून्य आहेत. विभागाच्या नोंदीनुसार होत असलेल्या उपाययोजना प्रत्यक्षात ( वास्तवात) कुठेही होताना दिसत नसल्याने केवळ कागदोपत्री घोडे नाचवले जात असल्याची टीका होत आहे.

# महाराष्ट्र शासनाच्या संदिग्ध भूमिकेमुळे वारकऱ्यांमध्ये तिव्र असंतोष

## २४ आक्टोबरला इशारा मोर्चा - वारकरी मेळावा सिद्धबेट प्रश्न वारकऱ्यांची अस्मिता





**अकोट,दि.१२ (प्रतिनिधी) :**

विश्वमाऊली श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांची जन्मभूमी, लीलाभूमी, कर्मभूमी, वास्तव्यभूमी असणारे श्रीक्षेत्र आळंदी देवाची येथील सिद्धबेट ही वारकऱ्यांची अस्मिता तथा श्रद्धास्थान आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाच्या संदिग्ध आणि दुहेरी भूमिकेमुळे वारकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाल्याच्या भावना व्यक्त होत आहेत.

स्थानिक श्री संत नरसिंह महाराज समाधी मंदिर येथील श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगतेप्रसंगी आयोजित वारकरी भाविकांच्या कार्यक्रमात हा तीव्र असंतोष स्पष्ट दिसून आला. गुरुवर्य श्री संत वासुदेव महाराज यांनी सनदशीर मार्गाने प्रदीर्घ संघर्ष करून तपोवन संस्थेकडून श्री क्षेत्र सिद्धबेट मुक्त केले. याकरिता श्री महाराजांनी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करुन २५ कोटी रुपयांचा निधी सिद्धबेट विकासकामी मंजूर करुन घेतला आणि खुद्द शासना मार्फत सिद्धबेटचे जागेवर विकास कार्य करीत असून ५० विकास पूर्णत्वास आले आहे. सदरची जमीन पुर्वापारच महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात होती व पुन्हा विद्यमान उच्च न्यायालयाचे आदेशानुसार सन २००५ पासून ताब्यात आहे.

गत महिन्यामध्येच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे सिद्धबेट माऊली संस्थानकडे देखभाल व दुरुस्ती करिता वर्ग केल्याची घोषणा केली आहे. या निर्णयाचे स्वागत करीत वारकरी भाविकांनी आनंद व्यक्त केला. परंतु, परवाचे दिवशी सदरहु संस्थेसोबत राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सिध्दबेट बाबत चर्चा केल्याचे त्यांचे अधिकृत फेसबुक अकाउंट वरून निदर्शनास आले.

या दोन बाबींमुळे वारकरी भाविक अस्वस्थ झाले असून शासनाची ही दुहेरी भूमिका अमान्य असल्याने समस्त वारक-यांच्या भावना दुखावणारी आहे असे मत श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेचे अध्यक्ष श्री.ह.भ.प. वासुदेवराव महाराज महल्ले यांनी व्यक्त केले. समस्त वारक-यांच्या भावना दुखावल्यामुळे शासनाच्या या दुहेरी भूमिकेबाबत इशारा मोर्चा तथा वारकरी मेळावा दिनांक २४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता श्रीक्षेत्र श्रद्धासागर आकोट येथे घेण्यात येत आहे. या मेळाव्यामध्ये वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ श्रेष्ठ महाराज मंडळी, आजी-माजी लोकप्रतिनिधी, वारकरी संप्रदायाच्या संघटना, धार्मिक देवस्थानांचे प्रतिनिधी, विविध सामाजिक संघटना यामध्ये सहभागी होणार आहेत.

## अकोला तहसील कार्यालय आएसओ मानांकनाच्या प्रतिक्षेत

**अकोला :** देखणे, रूबाबदार, श्रीमंत.. असे सर्वदृष्टीने सज्ज झालेले नव्या ईमारतीमधील अकोला तहसील कार्यालय आयएसओ मानांकनाच्या प्रतिक्षेत आहे. बुलडाणा जिल्ह्यातील लोणार, चिखलीनंतर आता अकोल्याचा नंबर लागणार असल्याचा दावा केला जातो आहे. त्या दिशेने अकोल्याचे तहसीलदार सुरेश कव्हळे यांची वाटचाल सुरू असून त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक होत आहे. महापालिका मुख्य कार्यालयाच्या मागे अकोला तहसील आणि उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय नव्या ईमारतीत अलीकडेच दाखल झाले. सदर कार्यालय प्रस्थापित होण्याआधीपासूनच तहसीलदार कव्हळे यांनी संपूर्ण ईमारत परिसराला शोभीवंत फुलझाडांनी सजविण्यास सुरूवात केली होती. सोबतच देशभरातील महान थोर पुरूषांच्या विचारांची श्रीमंती येथे सचित्र प्रदर्शित केली. कार्यालयाच्या परिसरात येताच चैतन्यमय व अल्हाददायक वातावरण अनुभवास मिळते. कोणत्याही शासकिय कार्यालयात अशी व्यवस्था दिसत नाही. ती व्यवस्था तहसीलदार कव्हळे यांनी कोणत्याही शासकीय खर्चाशिवाय उभारली आहे. शासनाचा कोणत्याही अतिरिक्त निधी न घेता त्यांनी शहरातील विविध सामाजिक संस्थांच्या मदतीने तहसील कार्यालयास श्रीमंत दर्जा मिळवून दिला आहे. त्याची निगा राखण्यासाठी काही खाजगी कर्मचारी देखील ठेवले गेले आहेत.

कार्यालय परिसरात कुठेच घाण, कचरा, पुड्या आदि दिसत नाही. कार्यालयाच्या दर्शनीभागात शेकडो वृक्षवेलींच्या कुंड्या आकर्षीत करतात. जिन्याच्या पायऱ्यांवरून चढताना प्रत्येक भागात महापुरूषांचे फोटो आणि त्यांचे बोलके विचार डोकावितात. वरच्या तहसीलदार कार्यल्याच्या पुढ्यात भव्य प्रतिक्षालय आहे.

# बालविवाह व बालहिंसा विरोधी जनजागृतीसाठी रॅली व मार्गदर्शन

## आंतरराष्ट्रीय बालिका दिवस मोठ्या उत्साहात साजरा




**अकोला,दि.१२ (प्रतिनिधी) :**

ॲसेस टु जस्टीस प्रकल्प इंडियन सोशल वेलफेयर सोसायटी अकोला यांच्या अंतर्गत आंतरराष्ट्रीय बालिका दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यालयातील ३०० किशोरवयीन विद्यार्थी व विद्यार्थिनींसह सावित्रीबाई कन्या शाळा ते अग्रसेन चौक, दीपक चौक पर्यंत जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीत बालविवाह, बालहिंसा व बालक अवैध वाहतूक या विरोधात घोषणांनी परिसर दणाणून गेला. तर शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत मुलगी वाचवा, देश वाचवा अशा घोषणांनी वातावरण भारुन टाकले.

रॅलीनंतर जिल्हा प्रकल्प समन्वयक शंकर वाघमारे यांनी आंतरराष्ट्रीय बालिका दिनाचे महत्व, बालविवाह, अत्याचार व बालक अवैध वाहतूक,शिक्षणाचे महत्त्व पटवून देत अकोल्यात मध्यप्रदेश, राज्यस्थान, छत्तीसगड येथून कामानिमित्त पालकांसोबत स्थलानंतर कुटुंबातील बालकांच्या शिक्षणाच्या समस्यांवर प्रकाश टाकला. समन्वयक सपना गजभिये यांनी दिवसेंदिवस वाढते बाल अत्याचार, बाल तस्करी, बालके सुरक्षिततेवर मार्गदर्शन केले. या उपक्रमातून बालिकांच्या हक्कांची जाणीव वाढवण्यास मदत होणार असून, भविष्यातही अशा कार्यक्रमांद्वारे बालविवाह व बालहिंसा प्रतिबंधित करण्यात येतील, असे मत व्यक्त करण्यात आले.रॅलीत सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापिका डॉ. फारेहा सुलताना, सर्व शिक्षकांवृंद, चाईल्ड लाईन सदस्य, यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन संचालक अशोक बेलेकर यांचे लाभले, जिल्हा प्रकल्प समन्वयक शंकर वाघमारे, समन्वयक सपना गजभिये, विशाल गजभिये, कम्युनिटी सोशल वर्कर राजश्री कीर्तिवार, पूजा मनवर, पूजा पवार, स्वयंसेवक गणेश चितोळे, निखिल चितोळे यांनी परिश्रम घेतले.

## सर्जनशील शब्दवेल राज्यस्तरीय साहित्य संमेलनामध्ये

# साहित्यिक कवी देवानंद गहिले यांच्या कवितेने दिला मानवतेचा संदेश




**पातुर,दि.१२ (प्रतिनिधी) :**

विदर्भाचे आराध्य दैवत संत श्री गजानन महाराज नगरी शेगाव येथे सर्जनशील शब्दवेल साहित्य संघ, पनवेल आयोजित राज्यस्तरीय साहित्य संमेलनात पातूरचे कवी देवानंद गहिले यांनी सादर केलेल्या मानवतावादी कवितेतून दिलेल्या संदेशाने कवी साहित्यिक आणि रसिकांचे लक्ष वेधले होतेविदर्भाच्या संतभूमीत, संत श्री गजानन महाराजांच्या पावन नगरी शेगाव येथे सर्जनशील शब्दवेल साहित्य संघ, पनवेल यांच्या वतीने ५ वे राज्यस्तरीय साहित्य संमेलन दिनांक ४ व ५ ऑक्टोबर २०२५ रोजी मथुरा लॉन्स येथे मोठ्या उत्साहात पार पडले. राज्यभरातील नामवंत साहित्यिक, कवी, लेखक आणि साहित्यप्रेमींच्या उपस्थितीने हे संमेलन साहित्यरसिकांसाठी एक अविस्मरणीय पर्व ठरले.या संमेलनात पातूर येथील ज्येष्ठ कवी देवानंद गहिले यांना ङ्गनिमंत्रित कवीङ्ग म्हणून विशेष आमंत्रण देण्यात आले होते. त्यांनी या प्रसंगी सादर केलेली त्यांची प्रेरणादायी कविता दगड ही मानवी मूल्यांचा गाभा व्यक्त करणारी ठरली. त्यांनी ही कविता स्वतः च्या खास गायनात्मक शैलीत सादर करत प्रेक्षकांना भावविभोर केले.कवितेतून श्री गहिले यांनी मानवतेचा सशक्त संदेश देत समाजात मानवी मूल्यांचे जतन करण्याचे आवाहन केले. त्यांनी आपल्या प्रभावी ओळींतून जीवन आणि ज्ञान यांच्यातील नातं अधोरेखित करत म्हटलं भूषवले होते, तर प्रमुख उपस्थिती म्हणून अंकुर साहित्य संघाचे केंद्रीय अध्यक्ष हिम्मत ढाळे, तसेच महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंडळाचे सदस्य पुष्पराज गावंडे यांच्यासह अनेक नामवंत कवी व साहित्यिक उपस्थित होते.

# कराओके क्लब मोरेश्वर कॉलनी येथे कोजागिरी उत्साहात साजरी





**अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

कराओके क्लब मोरेश्वर कॉलनी अकोला येथे कोजागिरी पौर्णिमेला कोजागिरी उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी अनेक गायकांनी एकापेक्षा एक सुंदर गीत गायन करून उपस्थित मित्रमंडळींचे मनोरंजन केले प्रत्येकाने आपापली कला या कार्यक्रमांमध्ये सादर केली.एकही शब्द इंग्रजी घेता शुद्ध मराठी भाषेत संवाद साधणे. हा खेळ घेतल्या गेला.

यावेळी अंताक्षरी खेळण्यात आली त्यासोबतच यावेळी गरमागरम आलूवडे, कांदेभजी च्या मेजवानी सह गरमागरम मसाला दूध सुद्धा होते. असा नियोजनबद्ध कार्यक्रम पार पडला यावेळी सौ. स्वानंदी पांडे, कमल घरडे, सपना कपले, मंजुषा बुडकले, शास्त्रीय गायिका मनिषा देव ,राजू बुडकले, प्राध्यापक संजय तिडके,निर्माण मल्टीस्टेटचे संचालक.विठ्ठल देशमुख, डॉ वाघोडे, दिनेश चंदन. प्राध्यापक गावंडे, अँड. रमेश वाकडकर, अँड. सुधीर सातव अँड. रवी शर्मा ,अँड. दिलीप जोशी ,प्रभाकर भिसे,गजानन पाटील यांचे सह यावेळी अकोल्यातील प्रतिष्ठित आमंत्रित केले उपस्थित होते.

# कपाशीवरील तंबाखूची पाने खाणाऱ्या अळीच्या प्रादुर्भावाची

## कृषि विभाग-कृषि विद्यापीठाने घेतली दखल!

**अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील कापूस संशोधन विभागाच्या वतीने अकोट तालुक्यातील विविध गावांतील शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रांना दिनांक १०/१०/२०२५ रोजी भेट देण्यात आली. यावेळी कपाशी पिकावर तंबाखूची पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून आले. या अळीच्या प्रादुर्भावामुळे पिकाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता निम र्ण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन देण्यासाठी संशोधन विभागाचे तज्ञ शेतकऱ्यांच्या शेतांवर गेले.या वेळीतरोडा, कुटासा, दिनोडा, रोहनखेड, जउळका, रोंदळा, पारोळा आदी गावांतील शेतांवर भेट देऊन कापूस पिकाची सद्यस्थिती, कीड प्रादुर्भावाचे निरीक्षण आणि पुढील पीक व्यवस्थापनाचे नियोजन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी श्री. पी. पी. पाटील (कापूस कीटकशास्त्रज्ञ),. श्री.निलेश सुरडकर, मंडळ कृषी अधिकारी,



अकोट त्यांच्यासोबत कापूस विभागातील श्री. मंगेश खाडे आणि श्री. श्रीकांत सरप उपस्थित होते.या प्रसंगी श्री. पाटील यांनी तंबाखूची पाने खाणाऱ्या अळीची ओळख, नुकसानीचे प्रकार, जीवनचक्र तसेच एकात्मिक कीड नियंत्रण (खझच) याबाबत शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, जर आर्थिक नुकसान पातळी (सुमारे ५ टक्के फुले, पाते व बोंडांचे नुकसान) दिसून आली असेल, तर खालील कीटकनाशकांपैकी कोणतेही एक कीटकनाशक फवारावे -क्लोरँट्रानिलीप्रोल १८.५% ईसी - ३ मिली प्रति १० लिटर पाणी किंवा स्पिनेटोरम ११.७% एससी - १० मिली प्रति १० लिटर पाणी किंवा क्लोरोपेरिफॉस ५० % + सायपरमिथ्रीन ५% ईसी - २० मिली प्रति १० लिटर पाणीही औषधे योग्य प्रमाणात वापरल्यास या किडीचा प्रादुर्भाव आटोक्यात आणता येतो.

असे त्यांनी नमूद केले.तसेच कृषी विभागातील मंडळ अधिकारी श्री. निलेश सुरडकर यांनी शेतकऱ्यांना कीटकनाशक फवारणीवेळी तोंडावर मास्क लावणे आणि शरीराचे संरक्षण करण्यासाठी योग्य उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे आवाहन केले.या शेतभेटीमध्ये गावातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या प्रसंगी प्रवीण साबळे, अवि साबळे, योगेश साबळे, वैभव शेळके, संजय खेकडे, झांबरे, विनोद कडू, रामदास काळे आदी शेतकरी उपस्थित होते.

## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ गट कार्यालय

# अकोला येथे महिला भजन स्पर्धा उत्साहात संपन्न



**अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ येथ दिनांक ७/१०/२०२५ रोजी अकोला गटातंर्गत गटस्तरीय महिला भजन स्पर्धा मा.प्रभारी सहाय्यक कल्याण आयुक्त सौ वैशाली नवघरे यांचे मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.या स्पर्धेमध्ये अकोला वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यातील १७ संघ सहभागी झाले.

या स्पर्धेचे परीक्षण श्री अजय देवपुजे, डॉ.श्री अजय सोळंके डॉ.सौ मनीषा पोहनकर यांनी केले .या प्रथम क्रमांक कामगार कल्याण केंद्र कारंजा*यांनी पटकावला द्वितीय क्रमांक कामगार कल्याण केंद्र मलकापूर बुलढाणा यांनी तृतीय क्रमांक कामगार कल्याण केंद्र शिवणी उत्तेजनार्थ प्रथम कामगार कल्याण केंद्र मलकापूर अकोला ,द्वितीय कामगार कल्याण केंद्र पारस यांनी पटकावला , उत्कृष्ट तबलावादक प्रथम क्रमांक पद्मजा खानझोडे द्वितीय क्रमांक सपना गवळी पेटी वादक पेटी वादक प्रथम क्रमांक वंदना शेटे द्वितीय क्रमांक ज्योती जाजु तृतीय क्रमांक कीर्ती अंबुसकर उत्कृष्ट गायक प्रथम क्रमांक मयूरी कपिले द्वितीय क्रमांक मेघा खांनझोडे, तृतीय वर्षा दरस्कर उत्कृष्ट तालसंच प्रथम क्रमांक काम गार कल्याण केंद्र कारंजा द्वितीय कामगार कल्याण केंद्र तृतीय मलकापूर कामगार कल्याण केंद्र शिवनी स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रम श्री विजय केंदरकर संपादक दैनिक मतदार यांचे अध्यक्षतेखाली तर प्रमुख पाहुणे म्हणून विठ्ठल परिवार नामजप प्रमुख महाराष्ट्र राज्य श्री. संतोषदादा पिसे आणि भारतीय जनता पक्ष कामगार मोर्चा प्रदेश सचिव श्री आशिष ढोणे तथा कामगार कल्याण अधिकारी सौ वैशाली नवघरे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

## एनएलसी इंडियात २०७ पदांची भरती

**अकोला,दि ११ (प्रतिनिधी) :**

एनएलसी इंडिया लिमिटेड अंतर्गत आयटीआय,ट्रेड अप्रेंटिस, डिप्लोमा, टेक्निशियन अप्रेंटिस, पदवीधर (अभियांत्रिकी) पदवीधर (नॉन-अभियांत्रिकी) अप्रेंटिस पदांच्या जागा अप्रेंटिस, भरण्यासाठी पदांनुसार पात्र असणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागवण्यात येत आहे. अर्जऑनलाइन पद्धतीने करायचा आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख २३ ऑक्टोबर आहे.अधिक माहिती. हत्मह. ग्ह या संकेतस्थळावर आहे. अर्जात कोणत्याही त्रुटी राहणार नाही याची काळजी उमेदवारांनी घ्यावी, असे कळिवण्यात आले आहे.

## कृषी विद्यार्थ्यांकडून शेतकऱ्यांसमोर नीम बियांच्या अर्काची प्रात्यक्षिक तयारी



**अकोला,दि १२ (प्रतिनिधी) :**

अकोला कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बाभुळगाव येथे शेतकऱ्यांसमोर नीम बियांच्या अर्काची (छडघए) प्रात्यक्षिक तयारी करून दाखवली. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना नीम अर्काची तयारी, त्याचे प्रमाण, वापरण्याची पद्धत आणि पिकांवरील कीड नियंत्रणामधील त्याचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

हा उपक्रम अकोला कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर, कीटकशास्त्र तथा शिक्षण शाखाप्रमुख डॉ. गिरीश जेऊघाले, समन्वय अधिकारी डॉ. अनिल खाडे आणि डॉ. प्रेरणा चिकटे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.कार्यक्रमाचे आयोजन आणि सादरीकरण कृषी महाविद्यालय अकोला येथील विद्यार्थी अखिलेश भगत, मनीष मीणा उपस्थित होते.

चंदन पांडा, ज्योती गुप्ता, नेहा ताजने, शितल वानखडे, साक्षी घाटे, लक्ष्मी वाटाणे, वैष्णवी तेरसे, तन्वी ठाकरे, मैथिली तिरपुरे, अनुज्ञा थापड आणि पलक वसू यांनी उत्साहपूर्वक केले.


RNINO-46973/1986 **महासागर अकोला** मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# : धर्मांतर घोषणा वर्धापनदिन :
## सामाजिक परिवर्तनाचा क्रांतिकारी प्रवास



१३ ऑक्टोबर हा दिवस भारतीय सामाजिक इतिहासात एका विलक्षण क्रांतीचा साक्षीदार आहे. १९३५ मध्ये १३ ऑक्टोबर या दिवशी येवला (जिल्हा नाशिक) येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मी हिंदू धर्म सोडणार आहे अशी घोषणा करून एका अशा ऐतिहासिक चळवळीची मुहूर्तमेढ रोवली, ज्याने भारतीय समाजाच्या रचनेला आणि विचारविश्वाला नवा आकार दिला. म्हणूनच हा दिवस धर्मांतर घोषणा वर्धापनदिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. तो फक्त एका धार्मिक निर्णयाचा दिवस नाही, तर भारतीय समाजाच्या आत्ममुक्तीचा, सन्मानाच्या जागृतीचा आणि मानवी स्वातंत्र्याच्या उद्घोषाचा दिवस आहे.

---------------

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण जीवन हे अन्याय, अस्पृश्यता आणि जातीय अत्याचारांविरुद्धच्या संघषार्चे प्रतीक होते. ते केवळ कायदेतज्ज्ञ नव्हते; ते एक चिंतनशील क्रांतिकारक, समाजशास्त्रज्ञ आणि मानवतावादी होते.

त्यांनी ज्या समाजात जन्म घेतला, त्या समाजाने त्यांना अस्पृश्यतेच्या विळख्यात ढकलले होते, पण त्यांनी त्या विषमतेवर मात करून संपूर्ण मानवजातीला जागवणारा विचार दिला. जात ही धर्माची देणगी नाही, आणि धर्म जर विषमता शिकवत असेल, तर असा धर्म माणसाचा शत्रू आहे, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली.

या विचाराची सर्वांत ठोस अभिव्यक्ती म्हणजे त्यांची धर्मांतर घोषणा होय. १९३५ साली झालेल्या येवला येथील त्या परिषदेला हजारो लोक उपस्थित होते. बाबासाहेबांनी त्या दिवशी जाहीर केलं की मी हिंदू धर्माचा जन्माने आहे, पण मृत्यूने नाही. ही घोषणा केवळ वैयक्तिक नकार नव्हती, तर संपूर्ण सामाजिक क्रांतीचा प्रारंभबिंदू होती.

त्यांनी हिंदू धर्माच्या चौकटीत सुधारणा शक्य नाही, हे ओळखले होते. त्या काळात त्यांनी म्हटले होते की, आपण या धर्मात राहिलो, तर आपल्याला कधीच समानता आणि सन्मान मिळणार नाही. त्यामुळे आपल्याला हा धर्म सोडून जाणे भाग आहे. त्या घोषणेने भारतीय समाजात एक गडगडाट केला. उच्चवर्णीय धार्मिक शक्ती हादरल्या, आणि दलित समाजात एक नवसंजीवनी निर्माण झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली, पण ते कोणत्या धर्मात जाणार हे त्या वेळी निश्चित केले नव्हते. कारण त्यांच्यासाठी धर्म बदलणे म्हणजे श्रद्धा बदलणे नव्हते; ते एक विचारांतर होते, अन्यायाच्या प्रणालीपासून मुक्त होण्याची प्रक्रिया होती.

पुढील दोन दशकांत त्यांनी ख्रिश्चन, इस्लाम, शीख, बुद्ध, इत्यादी धर्मांचा सखोल अभ्यास केला. त्यांना असा धर्म हवा होता जो माणसाला समानतेने वागवेल, बुद्धीला स्वातंत्र्य देईल आणि जीवनात नैतिकतेचा अधिष्ठान देईल. अखेरीस त्यांनी बौद्ध धम्माची निवड केली, कारण बुद्ध धम्मात तर्क, करुणा, समता आणि अहिंसा ही मूल्ये होती, जी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाशी पूर्णतः जुळणारी होती.

पण १९३५ ची ती घोषणा हेच खरे टर्निंग पॉइंट ठरले. त्या दिवशी त्यांनी दलित समाजाला जागवले की गुलामी ही केवळ सामाजिक किंवा आर्थिक नाही, ती मानसिक आहे, आणि त्या मानसिक गुलामीतून मुक्त होण्यासाठी धर्मांतर हे आवश्यक आहे. धर्मांतर म्हणजे नव्या समाजरचनेची पायाभरणी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्माला एक सामाजिक संस्था म्हणून पाहिले.

त्यांच्या मते, धर्म जर मानवी मूल्यांना तोडत असेल, तर तो समाज नष्ट करतो. म्हणून त्यांनी धर्मांतराला सामाजिक सुधारणा म्हणून मांडले, आणि त्यामुळे ही चळवळ धार्मिक स्वरूपाची असली तरी तिचा मूळ गाभा हा सामाजिक न्याय आणि मानवमुक्ती होता.

१३ ऑक्टोबरची ती घोषणा झाल्यानंतर भारतातील दलित, शोषित, वंचित वर्गात नवा आत्मविश्वास निर्माण झाला. लोकांना आपल्या दुःखाचे मूळ धर्मातील विषमतेत असल्याचे उमगले. हजारो कार्यकर्त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांचा प्रचार सुरू केला. त्यांच्या या विचारसरणीला अनेकांनी धार्मिक विरोधही केला, पण सामाजिक परिणाम मोठे झाले. हिंदू धमार्तील सुधारकांना जातीसंस्थेवर विचार करावा लागला. देशभरात समता, बंधुता, आणि धार्मिक स्वातंत्र्यावरील चर्चा सुरू झाल्या. हे सर्व त्या एका घोषणेचे सामाजिक परिणाम होते.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी अखेर बाबासाहेबांनी नागपूर येथे दीक्षाभूमीवर लाखो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. त्या दिवशी त्यांनी मी बौद्ध धर्म स्वीकारतो असे म्हणताना समाजाला नव्या युगात नेले. हे धर्मांतर केवळ धार्मिक नसून, तो एक सांस्कृतिक आणि नैतिक पुनर्जन्म होता. धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून आजही १४ ऑक्टोबर साजरा केला जातो, पण त्याची बीजे १३ ऑक्टोबर १९३५ च्या घोषणेतच पेरली गेली होती. म्हणूनच १३ ऑक्टोबरचा दिवस हा भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्वाचा आहे.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

या घोषणेने धर्म आणि समाज यांच्यातील नाते पुन्हा परिभाषित केले. धर्म हा माणसासाठी असावा, समाजाच्या शोषणासाठी नव्हे, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगाला दाखवले. त्यांनी धर्मांतराच्या माध्यमातून मानवधर्म या संकल्पनेचा उदय घडवला.

त्यांच्या मते, खरा धर्म तोच जो माणसाला विचार करण्याचे स्वातंत्र्य देतो, स्त्रीपुरुष समानतेचा आदर करतो, आणि अहिंसेच्या मागानें समाजात न्याय निर्माण करतो. बौद्ध धम्माने हे सर्व मूल्ये दिली, आणि म्हणून त्यांनी तो स्वीकारला. धर्मांतर म्हणजे नव्या जीवनाचा मार्ग, नव्या मूल्यांचा अंगीकार, आणि नव्या सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याचा संकल्प होय.

आज ८९-९० वर्षांनंतरही त्या घोषणेचे महत्त्व कमी झालेले नाही. भारतीय समाज अजूनही जात, धर्म, आणि वर्ण यांच्या भिंतींमध्ये अडकलेला दिसतो. सामाजिक न्यायाची लढाई अजून अपूर्ण आहे. अनेक ठिकाणी दलितांवर अत्याचार, अस्पृश्यतेचे प्रकार, धार्मिक द्वेष, आणि विषमता कायम आहे.

या पार्श्वभूमीवर धर्मांतर घोषणा वर्धापनदिन आपल्याला पुन्हा एकदा आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडतो की आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या त्या संदेशापासून किती दूर गेलो आहोत?

धर्मांतर घोषणा म्हणजे फक्त धार्मिक पातळीवरील बदल नव्हता, तो मानसिक आणि सामाजिक परिवर्तनाचा शंखनाद होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारात धर्म म्हणजे मानवकल्याणासाठी असलेली नैतिक व्यवस्था. त्यांनी धर्माला शोषणाचे साधन नव्हे, तर परिवर्तनाचे साधन बनवले. म्हणूनच हा दिवस स्मरण करून देतो की खरी क्रांती मनात घडते, धर्म बदलला तरी जर विचार बदलला नाही, तर समाज बदलणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हणूनच सांगितले होते, मी धर्म बदलतोय, पण माझे उद्दिष्ट माणूस बदलणे आहे.

या घोषणेनंतर बौद्ध चळवळ महाराष्ट्रात आणि भारतभर फोफावली. लाखो लोकांनी बौद्ध धर्म स्वीकारला, शिक्षण, जागृती आणि आत्मसन्मान यांचा स्वीकार केला. पण आंबेडकरांची अपेक्षा केवळ धर्मांतरापुरती नव्हती; ती होती विचारांतराची. आज आपल्याला त्या विचारांतराला नव्या पिढीपर्यंत पोहोचवायचं आहे.

बौद्ध धर्मातील त्रिशरण आणि पंचशील ही तत्त्वे, बुद्ध, धम्म आणि संघात शरण जाणे; हत्या, चोरी, असत्य, व्यभिचार, आणि मद्यत्याग टाळणे ही केवळ धार्मिक नियम नसून मानवी आचरणाचे मार्गदर्शक आहेत. आंबेडकरांनी हे सामाजिक नैतिकतेचे शास्त्र म्हणून स्वीकारले.

धर्मांतर घोषणा वर्धापनदिन साजरा करणे म्हणजे त्या घोषणेच्या भावनेचे पुनरुज्जीवन करणे. या दिवशी देशभरात येवला आणि नागपूर येथे लाखो अनुयायी जमून त्या घोषणेची आठवण करतात. आजच्या काळात धर्मांतर हा शब्द अनेकदा वादग्रस्त ठरतो.

काही ठिकाणी राजकीय हेतूने या विषयाचा गैरवापर केला जातो. पण आंबेडकरांचे धर्मांतर हे कुठल्याही धार्मिक प्रलोभनामुळे नव्हते; ते बौद्धिक आणि नैतिक निर्णय होते. त्यांनी धर्मांतराला वैचारिक मुक्तीचा मार्ग बनवला. त्यांच्या मते, खऱ्या अर्थाने धर्मांतर म्हणजे मनुष्याच्या आत्मसन्मानाचा पुनर्जन्म होय. म्हणूनच धर्मांतर घोषणा वर्धापनदिन हा दिवस आपण माणूसपणाचा उत्सव म्हणून साजरा केला पाहिजे.

आज देशात आणि जगात असहिष्णुतेचे, धार्मिक द्वेषाचे वातावरण वाढत आहे. अशा वेळी डॉ. आंबेडकरांची धर्मांतर घोषणा आपल्याला पुन्हा मानवतेचा धर्म शिकवते. ती सांगते की धर्म जर विभाजन निर्माण करत असेल, तर तो धर्म नाही; जो एकता आणि करुणा निर्माण करतो, तोच खरा धर्म आहे.

धर्मांतर घोषणा म्हणजे विभाजन नव्हे, तर एकात्मतेचा नव्या स्वरूपातील प्रयत्न आहे. ती व्यक्तीला विचारशील बनवते, आणि समाजाला समतेकडे नेते. आजच्या पिढीसमोर नवे प्रश्न आहेत, धर्माच्या नावावर हिंसा, राजकारणातील द्वेष, जातीय गटबाजी, आर्थिक विषमता, स्त्रीविषयक असमानता. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून आंबेडकरांनी दिलेला मार्ग अजूनही तितकाच प्रभावी आहेः

शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. धर्मांतर घोषणा वर्धापनदिन आपल्याला आठवण करून देतो की या संघषार्ची दिशा केवळ राजकीय नाही, ती मानसिक आणि नैतिक असली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या जीवनात समतेची, करुणेची आणि न्यायाची मूल्ये अंगीकारली, तर खरी धम्मक्रांती घडेल.

# कॉँग्रेसची खरी कसोटी बिहारमध्येच

बिहार विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम नुकताच जाहीर झाला आहे.या निवडणुका इतर कोणत्याही राजकीय पक्षापेक्षा कॉंग्रेससाठी अतिशय महत्त्वाच्या आहेत. या निवडणुकांत कॉंग्रेसची कामगिरी पुर्वीपेक्षा चांगली झाली तर कॉंग्रेस संघटनेला नवी उभारी मिळू शकेल. मात्र पक्षाची कामगिरी खराब झाली तर सामान्य कॉंग्रेस कार्यकर्त्याचे मनोबल खच्ची होऊ शकेल.

---------------

राहुल गांधी यांच्या व्होटर अधिकार यात्रेमुळे कॉंग्रेसच्या बाजूने वातावरण निर्मिती तर चांगली झाली आहे.परंतु त्याचे मतपेटीत रुपांतर होण्यासाठी आवश्यक अशी मजबूत संघटना कॉंग्रेसकडे नाही. ३० ते ३५ वर्षे, कॉंग्रेसने लालू प्रसाद यादव यांच्या पक्षाबरोबर युती करुन बिहारमध्ये निवडणुका लढवल्याने, जागा वाटपात जेवढ्या जागा मिळतील तेवढ्याच जागा कॉंग्रेसने लढवल्या. याचा थेट परिणाम म्हणजे कॉंग्रेसने मर्यादित जागाच लढवल्या. बिहारमध्ये असे कितीतरी मतदार संघ आहेत, जेथे कॉंग्रेसने गेल्या काही वर्षांत आपला उमेदवार उभा केलेला नाही. गेल्या खेपेइतक्या जागा कॉंग्रेसच्या वाट्याला येणार नाहीत.

गेल्या खेपेस कॉंग्रेसच्या वाट्याला जागा वाटपात ७० जागा आल्या होत्या.परंतु त्यापैकी फक्त १९ जागाच कॉंग्रेसला जिंकता आल्याने यावेळी कॉंग्रेसची बार्गेनिंग पॉवर कमी झाली आहे. अर्थात राहुल गांधी यांच्या व्होटर अधिकार यात्रेला बिहार मधील जनतेचा जो प्रतिसाद मिळाला तो पहाता कॉंग्रेसच्या अपेक्षा वाढल्या असणार हे नक्की.

२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेसने पुवीर्पेक्षा सरस कामगिरी केल्याने कॉंग्रेसचे मनोबल वाढले होते.मात्र त्यानंतर झालेल्या हरियाणा, महाराष्ट्र, झारखंड आणि दिल्ली विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसची कामगिरी निराशाजनक झाली. लोकसभा निवडणुकी नंतर लगेचच हरयाणा विधानसभेच्या निवडणुका झाल्या.२०१४ ते २०२४ अशी सलग दहा वर्षे हरयाणामध्ये सत्तेवर असलेल्या भाजपाच्या विरोधात अँटी इन्क्युंबन्सी फॅक्टर जोरात होता.

लोकसभा निवडणुकीत हरयाणामध्ये कॉंग्रेसची कामगिरी सरस झाल्याने कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. अशा परिस्थितीत हरयाणा विधानसभेच्या निवडणुकीत, कॉंग्रेस, भाजपाचा सहज पराभव करेल असे वातावरण होते. मात्र भाजपाने ४८ जागा जिंकून, हरयाणा मधील सत्ता कायम राखण्यात यश मिळविले. कॉंग्रेसला केवळ ३७ जागा जिंकता आल्या.

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीतही कॉंग्रेसला उत्तम कामगिरी करण्याची संधी होती. शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी (शप) आणि कॉंग्रेस या पक्षांचा समावेश असलेल्या महाविकास आघाडीने लोकसभा निवडणुकीत नेत्रदीपक यश मिळविले होते. कॉंग्रेसच्या वाट्याला आलेल्या १७ जागांपैकी १३ जागा जिंकून कॉंग्रेसने मोठे यश मिळविले होते. परंतु निवडणुक निकाल जाहीर झाल्यानंतर कॉंग्रेस आणि तिच्या मित्र पक्षांची कामगिरी अविश्वसनीय अशीच होती.



अभय गोखले

कॉंग्रेसला विधानसभेच्या निवडणुकीत फक्त १६ जागांवर विजय मिळाला आणि कार्यकर्त्यांमध्ये निराशेचे वातावरण पसरले. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसला आणि तिच्या मित्र पक्षांना सत्तेवर येण्याची चांगली संधी चालून आली होती परंतु त्यांनी ती संधी वाया घालवली.

झारखंड विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसची कामगिरी त्यामानाने चांगली झाली. महत्वाचे म्हणजे कॉंग्रेसचा मित्र पक्ष असलेल्या झारखंड मुक्ती मोर्चाची कामगिरी चांगली झाल्याने आघाडीला, आपल्याकडील सत्ता कायम राखण्यात यश मिळाले. कॉंग्रेसला झारखंड विधानसभा निवडणुकीत १६ जागांवर विजय मिळाला. कॉंग्रेसची ही कामगिरी नक्कीच समाधानकारक होती.

२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत, दिल्लीमध्ये कॉंग्रेसला लोकसभेची एकही जागा जिंकता आली नव्हती.अर्थात कॉंग्रेसकडून तशी अपेक्षाही कुणी केली नव्हती. त्या पार्श्वभूमीवर दिल्ली विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसची कामगिरी बऱ्यापैकी होईल अशी आशा कुणालाही वाटत नव्हती. मात्र दिल्ली विधानसभा निवडणुकीचे निकाल जेंव्हा जाहीर झाले तेव्हा कॉंग्रेसची सुमार कामगिरी पाहून, बऱ्याच जणांना असे वाटले असेल की कॉंग्रेसला यापुढे दिल्लीत काहीही भवितव्य नाही.

२०१५ आणि २०२० च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेसला भोपळा फोडता आला नव्हता,त्याचीच पुनरावृत्ती २०२५ च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत झाली आणि कॉंग्रेसची पाटी पुन्हा एकदा कोरी राहिली.

कॉंग्रेसच्या दृष्टीने लाजिरवाणी गोष्ट म्हणजे कॉंग्रेसच्या बहुसंख्य उमेदवारांना आपले डिपॉझिट गमवावे लागले. एकंदरित दिल्ली विधानसभा निवडणुकीतील कॉंग्रेसची कामगिरी अतिशय निराशाजनक होती,असाच निष्कर्ष त्यातून काढावा लागेल.

या पार्श्वभूमीवर बिहार विधानसभेच्या निवडणुका होत आहेत.त्यामुळे कॉंग्रेसकरता या निवडणुका अतिशय महत्त्वाच्या आहेत. हरियाणा, दिल्ली आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील कॉंग्रेसच्या खराब कामगिरीनंतर, आपल्या कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी कॉंग्रेसला बिहार विधानसभा निवडणुकीत चांगली कामगिरी करावीच लागेल. अन्यथा कॉंग्रेसचे काही खरे वाटत नाही.

■ ■ ■

# काय तसे मी करू?
## बालमनाचा मनोवेधक अविष्कार

महाराष्ट्राच्या काव्यक्षेत्रात नवनव्या उपक्रमांसाठी चर्चेचा विषय असलेल्या कवितेच्या घराच्या वतीने देण्यात येणारा २०२५ चा बापूरावजी पेटकर राज्यस्तरीय उत्कृष्ट बालकवितासंग्रह पुरस्कार प्रसेनजीत गायकवाड यांच्या काय तसे मी करु? या बालकवितसंग्रहाला मिळाला. चंद्रपूर जिल्ह्यात शेगाव येथे ४ ऑक्टोबरला मिळालेल्या या पुरस्कारानिमित यवतमाळ येथील ज्येष्ठ कवी विनय मिरासे 'अशांत' यांनी या पुस्तकाचा करून दिलेला परिचय.

काय तसे मी करू? हा प्रसेनजित गायकवाड यांचा बालकविता संग्रह पाहिला, वाचला आणि मनात मिरवला. मुखपृष्ठ, छपाई, मांडणी, अक्षर-रचना, सजावट, आशयचित्रे, कागदयोजना, आकार, मनोगत, परिचय, मलपृष्ठ, लेखन आणि बालकविता सर्वच बाबतीत अत्यंत देखणा, मनोरम, भरदार, रंगतदार, नजाकतदार, बहारदार, विलोभनीय, चित्तवेधक, चमत्कृतीयुक्त व आशयपूर्ण झाला आहे.

प्रसेनजित गायकवाड यांची ही अत्युत्तम वाङ्मयकृती पाहून, वाचून, निरखून कुणीही अत्यानंदाची अनुभूती करू शकेल यात दुमत नाही, असे माझे मत झाले आहे.

काय तसे मी करू? हा कवीचा बालप्रश्न! पण क्षणभर मी असे म्हणेन, की हा प्रौढ कवीचाही प्रश्न असून त्याचे उत्तर, होय! असेच करा. तुम्ही असेच लिहा अन् असेच भरभरून जगाला द्या, असे म्हणावेसे वाटते. कारण एकूणच बालमनाला गुंतवून ठेवणारं, बालकांच्या चित्तवृत्तींना खुणावणारं, फुलवणारं असं हे पुस्तक झालंय!

सावित्रीच्या लेकींचं शाळेत जाणं, त्यांना शिक्षणाची वाट सोपी करणं, शिक्षण हा मनातला डोळा आहे हे सांगणं, वाईट बोलू, ऐकू वा पाहू नका हे पटवणं, अंकाच्या द्वारे अभ्यासाच महत्त्व विषद करणं, विविध प्राण्याची त्यांच्या नाना गुणवैशिष्ट्यांसह ओळख करून देणं, निसर्गातल्या आनंदाची ओळख करून देणं, शून्याचही स्थान आणि महत्त्व पटवून देणं आणि इतर बऱ्याच मौल्यवान बाबी या पुस्तकातून बालवाचकांच्या पुढ्यात ठेवलेल्या आहेत.

या बाबींची बालकांसोबतच पालकांनाही गरज आहे. हा संग्रह बालक-पालक संग्रह झालेला आहे. तसंही ज्यांना ज्यांना आपल्यातलं लहान मूल बघता, अनुभवता येतं त्या सर्व मोठ्यांसाठीही हा कवितासंग्रह अत्यंत उपयोगाचा आहे.

काय तसे मी करू? या कवितासंग्रहाचा नायक असलेला बालक आपल्या आईला विचारतो, आई मी फुलपाखरासारखे करू? आई मी झाड होऊन वाटसरूंना छाया आणि फळे देऊ? पाणी होऊन धरतीची तहान भागवू, की दिव्याची ज्योत होऊन अंधार नष्ट करू? ही तर खऱ्या माणसाची सारी लक्षणे! तयास मानव म्हणावे काय? अशा शब्दांत लोकमाता विदयेची जननी सावित्रीमाई ज्यांची निर्भत्सना करतात त्यांना याचं मोल नसणार; पण माणसाला माणूस बनविणारे हेच तर सारे घटक! त्यात तुमचा हा कवितासंग्रह मानवतेची पाठशाळा झाला आहे.




विनय मिरासे 'अशांत'
उमरसरा, यवतमाळ.
९४२०३६८२७२

हा बालकवितासंग्रह म्हणजे रंजन, प्रबोधन, मार्गदर्शन, सूचन, संवेदन, प्रसारण आणि परिवर्तन यांचा छोटा पण भरीव खजिना आहे. असा एकही बालसुलभ विषय नाही, की जो आपण मुलांसाठी कवितारूपाने मांडला नाही!

संविधानापासून पर्यावरणापर्यंत आणि विज्ञानापासून प्रबोधनापर्यंत सारेच विषय अत्यंत मार्दवपूर्ण शैलीत, समर्पक शब्दात भावपूर्ण बांधतआणि संवेदनपूर्ण काव्य वाक्यात आपण मांडला आहे. हा आपल्या प्रतिभेचा जसा चमत्कार आहे, तसाच आपल्यातील बालकप्रेमी कणवाळू शिक्षकाचा, समाजप्रेमी लोभस विचारवंताचा, देशप्रेमी समाजकार्यकर्त्याचा, बालकानुगामी सुजाण पालकाचा आणि मानवताप्रेमी-लेखक, कवी व सुधारकाचा मनोवेधक अविष्कार आहे.

या बालकवितातील एकही शब्द, एकही ओळ एकही विचार अनाठायी, अप्रस्तुत, आडनिडी, अयोग्य, असंगत वा अवाढव्य वाटत नाही. हेच आपल्या कवितांचे सर्वात मोठे यश व वैशिष्ट्य आहे.

एरवी मुलांसाठी लिहिताना बरेचदा उपदेशांच्या अतिरिक्त मात्रांचे कवितांचे छोटे निबंध झालेले मी पहिले आहेत. कल्पना चमत्कृतीतून आणि आनंददायी, नादपूर्ण लयदार शब्दांतून सत्प्रेरणा, संबोध, सदुपदेश व शिकवण हे बाल्कावितेचे प्राणतत्त्व पूर्णपणे गवसले आहे.

काय तसे मी करू? हा बालकाव्यसंग्रह सर्वात सुंदर व सर्वथा परिपूर्ण असा आहे. पुस्तकाच्या पानापानावरची सुयोग्य चित्रे, मनमोहक वाक्ये, आणि बालकांना रमवणारी कल्पनारम्यता या बाबी सांगण्यासाठी पुरेशा आहेत.

ढगांनाही वाऱ्यासंगे फुटतात का पाय?, मेथी पालक खाताना बाळ गालात हसतो. हिवाला भरले कापरे फार., पाऊस झाला ओलाचिंब. उन्हाळा झाला उष्माघात., तुम्ही तेवढे एक करा, मासिक धाडा त्वरे जरा., पाटी घेऊन शाळेत जाऊ., पुढे वाचतील गाड्या अनेक., जन्म मृत्यू काजा, झाड एक लावा. या आणि अशा अनेक ओळी कवीचे उत्तम शिक्षक, सुजाण पालक, देशप्रेमी नागरिक, ध्येयवादी कार्यकर्त्या, गुणवान व्यक्ती, प्रबोधनकार प्रचारक आणि श्रेष्ठ बालकवी असल्याचा पुरावा आहेत.

एकूणच काय तसे मी करू? हा बालकाव्यसंग्रह म्हणजे आजच्या शिक्षकांसाठी एक पथदिवा ठरावा! देशातील मुले हा संग्रह वाचतील तेव्हा वाचातील पण स्वतःला शिक्षक म्हणवून घेणारया प्रत्येक व्यक्तीने हा संग्रह वाचावा त्यावर विचार, चिंतन, चर्चा कराव्या, असे वाटते.

# वाचक लिहितात

## मनमंदिराची स्वच्छता करुयात

दिवाळी प्रकाशाचा आणि झगमगाटाचा उत्सव. दिवाळीमध्ये दाही दिशा, सर्व परिसर प्रकाशाने उजळून जातो. दिवाळीची चाहूल लागताच घर, अंगण, वास्तूची स्वच्छता करण्यासाठी, घरातील अडगळ काढण्यासाठी सर्वजणच लगबगीने कामाला लागतात. दिवाळीचा प्रत्येक दिवस हा कुठल्या ना कुठल्या देवतेशी संबंधित आहे. यामुळे दिवाळीतील विशिष्ट दिवशी त्या दिवशीच्या संबंधित देवतेची आराधना केली जाते.दिवाळीच्या काळात साक्षात देवता आपल्या घरी रहायला येणार आहे या भावाने देवतेच्या स्वागताची तयारी केली जाते. परंतू वास्तूच्या स्वच्छतेबरोबरच आपण आपल्या अंतर्मनाची देखील स्वच्छता करणे जरुरी असते. आपल्या मनामध्ये असणारी दोष-अहं यांची जाळीजळमटे प्रयत्नरुपी केरसूणीने झाडून काढायला हवीत.मनामध्ये कोणाविषयी प्रतिक्रिया असतील, पूर्वग्रह असतील, द्वेष-मत्सर, राग असेल तर यांचे तत्परतेने निर्मूलन केल्यास ईश्वर आपल्या मनात नक्कीच निवासाला येणार. आपले मन निर्मळ, शुध्द, पवित्र, पारदर्शक करुयात. कारण, जेथे निर्मळता, शुध्दता, पवित्रता, पारदर्शकता असते तेथेच ईश्वराला रहायला आवडते. यासाठी दिवाळीच्या स्वच्छतेची सुरुवात आपले अंतर्मन स्वच्छ करण्यापासून करुयात. आपले मनमंदिर दिवाळीच्या स्वागतासाठी स्वच्छ करूयात.

■ भीमराव साळुंखे, सातारा.

## पिलावळीचा बंदोबस्त व्हावा

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश भूषण गवई यांच्यावर जोडा मारून फेकण्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली. हा निर्ढावलेला वकील कोणत्या संघटनेचा होता, हे जगजाहीर झाले. काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली, एनसीआरमध्ये फटाके फोडण्यास बंदी घातली होती. त्यावर आता कोणी धिरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा नामक एकाने आम्ही जुमानत नाही, फटाके फोडणारच म्हणून ओरडा चालवला आहे. न्यायाधिशांवर बूट काय फेकायचा, न्यायालयाला आव्हान काय द्यायचे? काय चाललं आहे देशात? हे असले उद्योग करणारे कोण आणि कुणाच्या इशाऱ्यावर चालले आहे? कोण संरक्षण देत आहे? लोकं जाणतात. अशा पिलावळींचा बंदोबस्त व्हायला हवा.

■ विवेक बनकर, नागपूर.

# केळ खाल्ल्याने खरंच पोट साफ होतं का?



सध्याच्या धावपळीत, कामामुळे स्वतःसाठी वेळ मिळणे थोडं अवघडच झालं आहे. त्यात आपण स्वतःच्या तब्येतीकडे तसेच खाण्यापिण्याकडे लक्ष देऊ शकत नाही. तसेच हेल्थी खाण्याच्या बाबतही दुर्लक्ष नक्कीच होते. आणि याचा परिणाम आपल्या पोटाच्या आरोग्यावर होतो. अनेकांना अपचनाचे त्रास सुरु होतात तर काहींना बद्धकोष्ठतेची समस्या.

बद्धकोष्ठता ही अशी समस्या आहे जी प्रत्येकाला आयुष्यात कधी ना कधी भेडसावते. काहींसाठी ती तात्पुरती असते, तर काहींसाठी ती दीर्घकालीन आणि जुनाट समस्या बनते. खाण्याच्या चुकीच्या सवयी, अस्वस्थ जीवनशैली, ताणतणाव, काही औषधे ही कारणे आहेत. या समस्येमुळे पोटही साफ होत नाही.

तज्ज्ञांच्या मते भरपूर पाणी पिऊन, फायबरयुक्त पदार्थांसह आणि फळे खाऊन बद्धकोष्ठतेवर नैसर्गिकरित्या उपचार करता येतात. त्यासाठी केळी या फळाचे नाव नेहमी समोर येतं. पण खरंच केळी खाल्ल्याने पोट साफ होते का?

**केळी खाण्याचे फायदे**

केळीमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम, व्हिटॅमिन बी ६, व्हिटॅमिन सी आणि प्रथिने यांसारखे पोषक घटक असतात. ते केवळ ऊर्जा प्रदान करत नाहीत तर आतड्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. पिकलेले केळी खाल्लयाने आतड्यांची हालचाल सुधारते आणि आतड्यांची हालचाल सुलभ होते. दीर्घकालीन बद्धकोष्ठता असलेल्या लोकांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पिकलेले केळी खावीत, कारण कच्च्या केळ्यांमध्ये स्टार्चचे प्रमाण जास्त असल्याने बद्धकोष्ठता वाढू शकते.

केळी केवळ बद्धकोष्ठतेसाठीच नाही तर अतिसार नियंत्रित करण्यासाठी देखील फायदेशीर असते. पिकलेल्या केळ्यांमध्ये पेक्टिन भरपूर प्रमाणात असते, जे पाणी शोषून घेते आणि मल किंचित घट्ट करते. अतिसाराने ग्रस्त असलेल्यांना केळी, भात, सफरचंदाचा रस आणि टोस्ट खाण्याची शिफारस डॉक्टर करतात. यामुळे पचन सुधारते आणि आतडे निरोगी राहतात.

केळीमधील पोटॅशियम आणि मॅग्नेशियम आतड्यांतील स्नायूंना आराम देते, ज्यामुळे आतड्यांची हालचाल सुलभ होते. पिकलेल्या केळीचे नियमित सेवन केल्याने बद्धकोष्ठता, पचन समस्या, पोटफुगी आणि गॅस कमी होतो. हे नैसर्गिक उपाय आतड्यांचे आरोग्य वाढवतात आणि दैनंदिन जीवनात पचन सुधारतात.

दीर्घकालीन बद्धकोष्ठतेवर उपचार करताना कच्ची केळी खाणे मात्र टाळले पाहिजे. असा सल्ला तज्ज्ञही देतात, कारण त्यामध्ये स्टार्चचे प्रमाण जास्त असते. पिकलेली केळी, भरपूर पाणी पिणे आणि फायबरयुक्त पदार्थांचे सेवन करणे पचन सुधारण्यास आणि नियमित आतड्यांची हालचाल राखण्यास खूप मदत करते.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### शोकांतिका

अत्र तत्र सर्वत्र उपदेशकांचा
झाला आहे सुकाळ
क्रीयेविण वाचाळता व्यर्थ आहे
हे त्यांना कधी कळणार ?

उपदेशांचा स्व आचरणातून
व्हायला हवा साक्षात्कार
त्याशिवाय आम आदमी
सांगा कसा प्रभावित होणार ?

ॲक्शन प्लॅन विना येत नाही
आत्मबलाची अनुभूती
बोले तैसा चाले त्याची
वेद पुराणही गाती महती..!

# बीव्हीजी इंडियातर्फे ३०० कोटी रु. फ्रेश इश्यू आणि २.८५ कोटी शेअर्सच्या ऑफर फॉर सेलसाठी डीआरएचपी सादर

**मुंबई, १२ ऑक्टोबर :** देशातील सर्वात मोठी इंटिग्रेटेड फॅसिलिटी मॅनेजमेंट (आयएफएम) सेवा पुरवठादार आणि पुण्यात मुख्यालय असलेल्या बीव्हीजी इंडिया लिमिटेड कंपनीने सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) कडे आपला ड्राफ्ट रेड हेअरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) दाखल केला आहे. त्याद्वारे कंपनी आपली प्राथमिक समभाग विक्री (आयपीओ) करणार आहे. या इश्यूमध्ये ३०० कोटी रु. पर्यंतच्या इक्विटी शेअर्सचे फ्रेश इश्यू आणि विद्यमान शेअरहोल्डर्सद्वारे २.८५ कोटी पर्यंतच्या इक्विटी शेअर्सची ऑफर फॉर सेल समाविष्ट आहे. फ्रेश इश्यूमधून मिळणाऱ्या उत्पन्नापैकी २५० कोटी रु. चा वापर कर्जफेड किंवा कर्जाची आगाऊ परतफेड करण्यासाठी केला जाणार असून उर्वरित रक्कम सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्देशांसाठी वापरण्यात येईल.

औद्योगिक, व्यावसायिक, आरोग्यसेवा, शिक्षण, प्रशासन आणि वाहतूक पायाभूत सुविधा अशा विविध क्षेत्रातील ग्राहकांना सेवा पुरवत कंपनी इंटिग्रेटेड फॅसिलिटी मॅनेजमेंट, इमर्जन्सी रिस्पॉन्स सर्व्हिसेस (ईआरएस) आणि एन्व्हायरन्मेंट अँड सस्टेनेबिलिटी सर्व्हिसेस (ईएसएस) अशा तीन व्यवसाय शाखांद्वारे कार्यरत आहे. आयएफएम अंतर्गत, बीव्हीजी इंडिया यांत्रिक हाऊसकीपिंग, जनिटोरियल सर्व्हिसेस, औद्योगिक हाऊसकीपिंग, मनुष्यबळपुरवठा, सुरक्षा, ऑफिस सपोर्ट आणि रिटेल फ्युएल आउटलेट मेंटेनन्स अशा सॉफ्ट सर्व्हिसेस देते; तसेच इलेक्ट्रो-मेकॅनिकल वर्क्स, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल अँड प्लंबिंग सेवा, दुरुस्ती व देखभाल, रस्ते व्यवस्थापन, शहर स्वच्छता आणि पायाभूत सुविधा देखभाल अशा हार्ड सर्व्हिसेस देते; तसेच केटरिंग, पेंट-शॉप क्लिनिंग, बॅक-ऑफिस सपोर्ट, लॉजिस्टिक्स मॅनेजमेंट आणि फ्लीट ऑपरेशन (ईव्ही बस व्यवस्थापन यांसह) अशा स्पेशलाइज्ड सर्व्हिसेस पुरवते. कंपनी ही इंडियन रेल्वेचीही विश्वासार्ह भागीदार असून, स्टेशन फॅसिलिटी ऑपरेशन्स, रोलिंग स्टॉक आणि ट्रॅक देखभाल तसेच ऑन-बोर्ड हाऊसकीपिंगचे व्यवस्थापन करते.

ईआरएस अंतर्गत, बीव्हीजी इंडियाने भारतात पोलीस इमर्जन्सी रिस्पॉन्स सेवा सुरू केली आणि प्रगत वैद्यकीय उपकरणांनी सुसज्ज व डॉक्टर्स नियुक्त असलेल्या म्ब्युलन्सची सुरुवात केली. विशेष म्हणजे, ॲम्ब्युलन्समध्ये डॉक्टर्स नियुक्त करण्याची पद्धत बीव्हीजी इंडियाने सुरू केली. त्यामुळे आपत्कालीन वैद्यकीय सेवांमध्ये नवे मापदंड प्रस्थापित झाले आणि सार्वजनिक सेवा वितरणात कंपनीचे नेतृत्व अधिक दृढ झाले. ईएसएस अंतर्गत, कंपनी कचरा व्यवस्थापन, होर्टीकल्चर, लँडस्केपिंग, वनीकरण, तलाव पुनरुज्जीवन, स्मार्ट सिटी प्रकल्प अशा सेवा पुरवते. तसेच सोलर मॉड्यूल्सचे उत्पादन आणि देशभरातील सौर प्रकल्पांसाठी जोडणी व देखभाल सेवा पुरवते.

३१ मार्च २०२५ पर्यंत बीव्हीजी इंडियाकडे देशभरात २,२१८ सक्रिय साइट्सवर कार्यरत ८५,००० पेक्षा जास्त कर्मचारी होते. त्यामुळे फॅसिलिटी मॅनेजमेंट क्षेत्रातील ती सर्वात मोठ्या कंपन्यांपैकी एक आहे. आर्थिक वर्ष २५ मध्ये, कंपनीने ३,३०१.८ कोटी रु. चे कामकाजामधून उत्पन्न, ३,३१९.५ कोटी रु. चे एकूण उत्पन्न आणि २०७.२ कोटी रु. चा करपश्चात नफा नोंदवला. त्यामुळे इक्विटी वरील परतावा (आरओई) १७.४४% इतका ठरला. कंपनीची मजबूत आर्थिक कामगिरी आणि वैविध्यपूर्ण बिझनेस मॉडेल नफा टिकवून ठेवताना कामकाज विस्तारण्याची क्षमता अधोरेखित करते.

हा आयपीओ आयसीआयसीआय सिक्युरिटीज लिमिटेड, जेएम फायनान्शियल लिमिटेड आणि मोतिलाल ओसवाल इन्व्हेस्टमेंट अॅडव्हायजर्स लिमिटेड द्वारे व्यवस्थापित केला जाणार असून एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड रजिस्ट्रार म्हणून काम करेल.

जागतिक आउटसोर्स्ड फॅसिलिटी मॅनेजमेंट (एफएम) बाजारपेठ २०२४ मध्ये १,०३० अब्ज अमेरिकन डॉलर इतकी होती. २०१९ ते २०२४ दरम्यान ४.२% ने सीएजीआर वाढला आहे. महामारीमुळे झालेल्या अडथळ्यानंतर २०२१ उशिरा पर्यंत ही बाजारपेठ पुन्हा २०२० पूर्वीच्या खर्चाच्या पातळीवर आली. पायाभूत सुविधा क्षेत्रातील वाढती गुंतवणूक, वेगवान औद्योगिकीकरण, स्मार्ट बिल्डिंग्सचा विकास आणि डिजिटल सोल्युशन्सचा वाढता स्वीकार यामुळे ही बाजारपेठ भविष्यात जोरदार वाढेल असा अंदाज आहे. उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमध्ये स्वच्छ, हरित आणि स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर विकसित करण्यासाठी खाजगी ऑपरेटर्सना करारबद्ध करण्याच्या सरकारी उपक्रमांमुळे अधिक संधी उपलब्ध होत आहेत. २०२९ पर्यंत, आउटसोर्स्ड एफएम बाजारपेठ १,४९५.१ अब्ज अमेरिकन डॉलरवर पोहोचेल असा अंदाज आहे. त्यासाठी २०२४ ते २०२९ दरम्यान सीएजीआर ७.७% राहील.

आपले नेतृत्वस्थान, विविध सेवा पोर्टफोलिओ, मजबूत अंमलबजावणी रेकॉर्ड आणि शाश्वततेप्रती बांधिलकीमुळे, बीव्हीजी इंडिया ही उद्योगातील या अनुकूल परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी आणि भारतातील इंटिग्रेटेड फॅसिलिटी मॅनेजमेंट व संबंधित सेवांमध्ये अग्रगण्य स्थान अधिक दृढ करण्यासाठी धोरणात्मकदृष्ट्या सक्षम आहे.

## संध्या ते नीना : मराठी अभिनेत्रींचा अविनाशी वारसा..





मराठी चित्रपटसृष्टीने नुकत्याच दोन परस्परविरोधी, पण परस्परसंबंधित घटना अनुभवल्या. पिंजरा फेम ज्येष्ठ अभिनेत्री संध्या (विजया देशमुख) यांचे निधन आणि संवेदनशील अभिनेत्री नीना कुलकर्णी यांना मिळालेला नवा प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार. एका बाजूला एका सुवर्णयुगाचा पडदा खाली आला, तर दुसरीकडे त्याच परंपरेचा वारसा सन्मानाने पुढे नेणाऱ्या अभिनेत्रीला गौरव प्राप्त झाला.

संध्या : एका युगाची नायिका

जय जय रघुवीर समर्थ, पिंजरा, सीताराम कल्याण, रंगिली, सखू, अमरभूपाळी, झनक झनक पायल बाजे अशा अनेक चित्रपटांमधून संध्या यांनी अभिनय आणि नृत्य यांची अद्भुत सांगड घातली. विशेषतः १९७२ मधील व्ही. शांताराम यांच्या क्लासिक चित्रपट पिंजरा मधील चंद्रा या तमाशा नायिकेची भूमिका ही त्यांच्या अभिनयशिखरावरील कामगिरी ठरली. त्या भूमिकेतून त्यांनी स्त्रीची संवेदना, प्रेमाची वेदना आणि समाजातील दुटप्पी मूल्यांची मांडणी अत्यंत हृदयस्पर्शीपणे केली. मला लागली कुणाची उचकी आणि तुम बिन जीवन कैसा सारख्या गाण्यांमधून त्यांचा अभिनय, नृत्यकौशल्य आणि भावनांची लय एकत्रितपणे अनुभवायला मिळते. संध्या या भरतनाट्यम आणि कथक या शास्त्रीय नृत्यशैलीत निपुण होत्या, आणि त्यांच्या प्रत्येक दृश्यात ती लय, रचना आणि नृत्यसंवेदना स्पष्टपणे जाणवते. त्या सुप्रसिद्ध दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या पत्नी होत्या आणि त्यांच्या अनेक चित्रपटांमागील मुख्य प्रेरक शक्ती म्हणून ओळखल्या जातात. झनक झनक पायल बाजे आणि दो आंखें बारह हाथ सारख्या चित्रपटांमागे त्यांची सौंदर्यदृष्टी, नृत्यसंवेदना आणि कलात्मक दृष्टिकोन ठळकपणे दिसून येतो. संध्या यांनी आपल्या अभिनयातून स्त्री-अभिनयाला एक नवी उंची दिली, जिथे सौंदर्याच्या पलीकडे जाऊन त्यांनी भावनांच्या गाभाऱ्यातील सत्य साकारले.

नीना कुलकर्णी : अभिनयाची सुसंस्कृत परंपरा

संध्या यांच्या निधनाच्या दुःखद पार्श्वभूमीवरच, मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील सशक्त, बुद्धिमान आणि संवेदनशील अभिनेत्री नीना कुलकर्णी यांना नुकताच मराठी रंगभूमीवरील मानाचा विष्णुदास भावे गौरवपदक पुरस्कार मिळाल्याची आनंदवार्ता आली. गेल्या चार दशकांपासून त्यांनी रंगभूमी, दूरदर्शन, सिनेमा आणि आंतरराष्ट्रीय प्रकल्पांमध्ये आपल्या अभिनयाची अमिट छाप सोडली आहे. महात्मा वि. गांधी, श्रीमान श्रीमती, बघतो मी तुला, मुक्ता, श्री इडियट्स, फोटो प्रेम, कुटुंब माझं यांसारख्या चित्रपट-नाटकांमधील त्यांच्या भूमिका सामाजिक वास्तवाशी घट्ट जोडलेल्या आहेत. त्यांच्या अभिनयात विचार, शिस्त, संवेदनशीलता आणि स्त्री-अस्मितेचा स्पष्ट आवाज जाणवतो. नीना कुलकर्णी यांनी मराठी-इंग्रजी सीमारेषा मिटवत 'The Best Exotic Marigold Hotel' आणि फ्रेंच चित्रपट 'Noces' (A Wedding) सारख्या आंतरराष्ट्रीय प्रकल्पांमध्येही उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

परंपरेचा पूल- कलेसाठी समर्पण आणि स्त्री-अभिनयाचा गौरव

संध्या आणि नीना, या दोघींच्या वाटा काळाने वेगळ्या केल्या, परंतु त्यांची कलायात्रा एकाच धाग्याने बांधलेली आहे. संध्या यांनी ज्या काळात स्त्रीला पडद्यावर केवळ सौंदर्याच्या चौकटीत बसवले जात होते, त्या काळात त्या अभिनय आणि नृत्याद्वारे विचार मांडत होत्या. नीना कुलकर्णी त्या परंपरेला आजच्या काळातील संवेदनशील आणि विचारशील अभिव्यक्तीतून पुढे नेत आहेत.

कलासृष्टीचा सलाम !

एका पिढीचा शेवट आणि दुसऱ्या पिढीचा सन्मान, हे दोन्ही क्षण मराठी कलासृष्टीसाठी आत्मपरीक्षणाचे आहेत. संध्या यांच्या तेजस्वी वारशाला सलाम, आणि नीना कुलकर्णी यांच्या कार्याचा गौरव! मराठी सिनेमा आणि नाट्यविश्व या दोन्हींची शोभा या दोन विलक्षण अभिनेत्रींच्या कर्तृत्वामुळे आज अधिक उजळून निघाली आहे.

**प्रा. विजय कोष्टी,**
**कवठेमहांकाळ, जि. सांगली.**

## एसयूडी लाइफने एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स फंड लाँच केला

**मुंबई, १२ ऑक्टोबर :** एसयूडी लाइफ इन्शुरन्सने एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स फंड लाँच करण्याची घोषणा केली आहे, हा एक नवीन फंड ऑफर आहे जो निफ्टी अल्फा ५० इंडेक्सचा मागोवा घेते, भारतातील सर्वाधिक सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या शेअर्सची ओळख करून देणारा स्मार्ट बीटा बेंचमार्क आहे. नवीन फंड ऑफर (एनएफओ) ६ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर २०२५ पर्यंत खुला आहे.

हा निर्देशांक भारतातील सर्वात मोठ्या आणि सर्वाधिक तरल कंपन्यांमधील अव्वल ५० शेअर्सचा समावेश करतो. हे शेअर्स त्यांच्या अल्फाच्या आधारे निवडले जातात , जे त्यांच्या अल्फाच्या आधारे निवडले जातात, जे जोखीम समायोजित केल्यानंतर व्यापक बाजारपेठेपेक्षा चांगले प्रदर्शन करण्याची प्रत्येक स्टॉकची क्षमता मोजते. निर्देशांकातील प्रत्येक स्टॉकचे वजन त्याच्या अल्फा स्कोअरद्वारे निश्चित केले जाते, ज्यामुळे परिमाणात्मक विश्लेषणावर आधारित कामगिरी-केंद्रित पोर्टफोलिओ तयार होतो.

या लाँचबद्दल बोलताना, एसयूडी लाईफचे मुख्य गुंतवणूक अधिकारी श्री. प्रशांत शर्मा म्हणाले - हा फंड गुंतवणूकदारांना इक्विटीमध्ये गुंतवणूक करण्याच्या अधिक विचारशील पद्धतीची सुविधा देण्याबद्दल आहे. केवळ बाजाराच्या आकाराचा मागोवा घेण्याऐवजी, ते कालांतराने चांगले परतावा देण्याची क्षमता दर्शविणाऱ्या कंपन्यांच्या कामगिरीवर लक्ष केंद्रित करते. ही कल्पना सोपी आहे, पद्धतशीर राहणे, गुंतवणूक करत राहणे आणि डेटाला निर्णय घेण्यास परवानगी देणे. युलिप शुल्कावरील ०% जीएसटीच्या अतिरिक्त फायद्यासह, पॉलिसीधारक आता कार्यक्षमता आणि संभाव्य वाढीचा आनंद घेऊ शकतात.

बाजारातील बदलत्या गतिमानतेनुसार चपळता सुनिश्चित करून, निर्देशांक तिमाहीत पुनर्संतुलित केला जातो. हा फंड क्षेत्रनिरपेक्ष दृष्टिकोनासह सातत्यपूर्ण अल्फा साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवतो, ज्यामुळे जोखीम संतुलित ठेवत संपूर्ण अर्थव्यवस्थेतील संधींचा लाभ घेता येतो.

मिड-कॅप बायस आणि उच्च-अल्फा घटकांवर लक्ष केंद्रित करून, हा फंड इक्विटी गुंतवणुकीसाठी स्मार्ट, डेटा-नेतृत्वाच्या दृष्टिकोनाद्वारे भारताच्या विकासाच्या कथेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या पॉलिसीधारकांसाठी योग्य आहे.

हा निधी एसयूडी लाईफच्या युनिट-लिंक्ड विमा उत्पादनांसह उपलब्ध असेल जसे की एसयूडी लाईफ वेल्थ बिल्डर प्लॅन, एसयूडी लाईफ ई-वेल्थ रॉयल आणि एसयूडी लाईफ स्टार ट्यूलिप प्लॅन.

याव्यतिरिक्त, अलिकडेच युलिप शुल्कावरील जीएसटी सूट (०% जीएसटी) मुळे, पॉलिसीधारकांना आता जीवन विमा कव्हरसह अधिक खर्च कार्यक्षमता आणि सुधारित निव्वळ परतावा मिळू शकतो, ज्यामुळे बाजार-संलग्न जीवन विमा उपायांद्वारे संपत्ती वाढवण्यासाठी ही एक योग्य वेळ बनली आहे.

हे लाँच मार्केट-संलग्न जीवन विमा योजनांसह जीवन कव्हरद्वारे संरक्षित राहून पॉलिसीधारकांना त्यांची संपत्ती वाढवण्यासाठी अधिक स्मार्ट, संशोधन-समर्थित मार्ग ऑफर करण्यावर एसयूडी लाइफचे सतत लक्ष केंद्रित करते.

## सतर्कता जागरूकता सप्ताहानिमित्त यूनियन बैंक ऑफ इंडिया, प्रादेशिक कार्यालय अमरावती तर्फे क्रिकेट स्पर्धेचे भव्य आयोजन

**नागपूर, १२ ऑक्टोबर :** सतर्कता जागरूकता सप्ताहानिमित्त यूनियन बैंक ऑफ इंडिया, प्रादेशिक कार्यालय अमरावती तर्फे एक मैत्रीपूर्ण क्रिकेट स्पर्धेचे भव्य आयोजन दिनांक ११-१०-२०२५ रोजी करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश कर्मचारीवर्गामध्ये प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि संघभावना वाढविणे हा होता.

कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्य अतिथी श्री प्रमोद परहाते, प्रादेशिक प्रमुख, यूनियन बैंक ऑफ इंडिया, अमरावती यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी सांगितले की, सतर्कता ही केवळ आठवडाभर चालणारी कृती नसून ती आपल्या कामकाज आणि जीवनाचा अविभाज्य भाग असली पाहिजे.




स्पर्धेमध्ये विविध शाखांच्या संघांनी उत्साहपूर्वक सहभाग घेतला. रोमांचक सामन्यानंतर विजेत्या व उपविजेत्या संघाला करंडक देऊन गौरविण्यात आले. सर्वश्रेष्ठ खेळाडूंना स्मृतिचिन्हे देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये सतर्कता अधिकारी श्री शंकर डोंगरे आणि आयोजन समितीचे विशेष योगदान राहिले. या उपक्रमातून कर्मचारीवर्गामध्ये केवळ क्रीडाभाव आणि संघभावना दृढ झाली नाही, तर सतर्कतेबाबतची जागरूकताही अधिक बळकट झाली


## चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू : किशोर कुमार

हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १३ ऑक्टोबर १९८७ रोजी किशोर कुमार यांचे निधन झाले. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटसोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. किशोर कुमार यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## शब्दकोडे क्रमांक २२३८




**आडवे शब्द :-**
१) सबका साथ सबका विकास घोषणा देणारे पंतप्रधान
१०) नाचणी
११) मागणारा
१२) लोणी
१३) कमी बोलणारा
१५) नकला करणारा
१७) नंतर
१९) टक्कर, धक्का
२१) अकरावी रास
२२) सोन्या चांदीचा धागा
२३) राज्ञी
२४) त्रास, कष्ट
२५) वटवट
२७) चांगला
२८) मला
२९) मोठा जाड हातोडा
३०) समुद्रातील अग्नी
३१) तोंडी वचन किंवा करार
३२) पाऊस
३३) एक शिकारी पक्षी
३५) नायट्रोजन
३६) समान
३८) भूपती
४०) इंद्रिय
४२) रूक्ष
४३) अर्धी ओंजळ
४४) पाठविलेला
४५) डामडौल, शोभा
४७) वर्षानुवर्षे
४८) चांदी
४९) नौदल
५०) अपवित्र
५१) खोटे कारण
५३) डोळ्यावरील उघडझापीचा अवयव
५४) तफावत
५६) धाक, वचक, भीती
५७) पाणकोंबडा
६०) वडील, निर्माता
६२) उत्तराधिकारी
६४) मोठा भाऊ
६५) जमीनदोस्त
६६) कबूतर
६७) माया, प्रेम

**उभे शब्द :-**
१) नीच, अतिशय पातकी
२) बिना छताची लहान बैलगाडी
३) रामदासस्वामींनी लिहिलेला एक ग्रंथ
४) करुणा, कीव
५) मांडणी
६) शपथ
७) आकर्षक, भुरळ पाडणारे
८) मनावर ठेवलेला ताबा, संयम
९) रात्री उमलणारे फूल
१२) होकारच्या विरुद्ध
१४) गडबड, भानगड, घोटाळा
१५) आकाश
१६) घराण्याची मान खाली घालावयास लावणारा अब्रू घालविणारा
१८) तारणपत्र
२०) आपल्या मताशी ठाम असणारा
२१) कर्णभूषण
२३) मराठी असे आमुची मायबोली, जरी आज ती **** नसे
२६) माळी
२८) अंत:करण
३०) जंगलात राहाणारे (प्राणी)
३४) स्वार्थासाठी गोड बोलणे
३५) नगारा वगैरे वाद्य ठेवण्याची खोली
३६) सावली
३७) मीठाची चव
३८) रात्रभर
३९) उदाहरण(हिं )
४०) राजपुत्र सलीमची प्रेयसी
४१) साधारण, सामान्य
४३) ओंजळभर
४६) सामान
४९) पाणी
५२) बिल्ला
५३) मर्यादा, सीमा (नसणे)
५४) शाळेच्या वर्गातील फलक,
५५) ऋणको, कर्ज घेणारा
५७) सुकामेव्यातील एक बी
५८) उष्ण
५९) दौतीतील रंगीत द्रव
६०) जास्वंद
६१) अभिनेता
६३) जाडसर पीठ

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेडला यूएस एफडीए नोंदणी, जागतिक हेल्थकेअर मॅन्युफॅक्चरिंगमध्ये भारताची स्थिती मजबूत

**मुंबई, १२ ऑक्टोबर :** लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेडला त्यांच्या सर्जिकल कंज्यूमेबल्स, ऑर्थोपेडिक सपोर्ट्स आणि हायजीन उत्पादनांच्या मालिकेसाठी यूएस एफडीए नोंदणी मिळाली आहे ही उपलब्धी कंपनीच्या उत्कृष्ट उत्पादन क्षमतेचे प्रतीक आहे आणि जागतिक हेल्थकेअर सप्लाय चेनमध्ये भारताची स्थिती अधिक मजबूत करते.



यूएस एफडीए नोंदणी उत्पादन सुरक्षा, गुणवत्ता आणि अनुपालनाचे सर्वोच्च मानक दर्शवते. भारतीय उत्पादकांसाठी हे अमेरिके, युरोपियन युनियन आणि मध्य पूर्व यांसारख्या नियमनयुक्त आंतरराष्ट्रीय बाजारपेठांचे दारे उघडते, ज्यामुळे व्यवसाय वृद्धीच्या अपूर्व संधी निर्माण होतात. लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीजसाठी ही त्यांच्या जागतिक विस्ताराच्या प्रवासातील ऐतिहासिक क्षण आहे, जे निर्यात संधी वाढवते आणि हेल्थकेअर मॅन्युफॅक्चरिंगमध्ये भारताला जागतिक नेतृत्वाकडे घेऊन जाते.

एफडीए-मान्यताप्राप्त उत्पादन पोर्टफोलिओ हेल्थकेअर श्रेणींच्या विस्तृत रेंजला कव्हर करते ज्यात मेडिकल कंज्यूमेबल्स जसे कॉटन क्रीप बँडेज, इलास्टिक अॅडहेसिव बँडेज, कॅनुला फिक्सेटर्स आणि डिसइन्फेक्टंट वेट वाइप्स, तसेच पुनर्वसन आणि ऑर्थोपेडिक उत्पादने जसे ऍब्डॉमिनल आणि रिब बेल्ट्स, लम्बर सपोर्ट्स, सर्वायकल कॉलर्स, टेलर ब्रेस, आर्म स्लिंग्स, शोल्डर इम्मोबिलायझर्स, कॉकअप स्प्लिंट्स आणि नी इम्मोबिलायझर्स यांचा समावेश आहे. लॉर्ड्स जॉय ब्रँड बेबी वाइप्स, बेड बाथ वाइप्स आणि रिफ्रेशिंग वाइप्ससह हा पोर्टफोलिओ पूर्ण करतो.

## राशीभविष्य

**मेष :** आज तुमचा मोठ्या लोकांशी संपर्क येईल. तुमच्या जोडीदारासोबत आवडत्या खरेदीचा आनंद घेऊ शकाल. मुलांकडून आनंददायी अनुभव मिळतील. ऑफिसमध्ये कोणावरही अवलंबून राहू नका.

**वृषभ :** नृत्यात रस असलेल्यांना लवकरच मोठी उंची गाठण्याची संधी मिळेल. आज कोणत्याही गोष्टीचा अतिविचार करणे टाळा, कारण यामुळे गोंधळ होऊ शकतो आणि तुमच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.

**मिथुन :** खाजगी नोकरी करणाजयांना पदोन्नतीची चांगली बातमी मिळू शकते. तुमच्या वडिलांचा सल्ला घेणे शहाणपणाचे ठरेल. तुमच्या वैवाहिक जीवनात गोडवा वाढेल.

**कर्क :** आज तुमच्या नोकरीत सुखद बदल अनुभवायला मिळतील. हृदयविकाराने ग्रस्त असलेल्यांनी चांगल्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. कामाच्या धावपळीमुळे तुम्हाला थकल्यासारखे वाटेल.

**सिंह :** आज तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल आणि तुमचे सध्याचे एटक निकाली निघतील. फॅशन डिझायनर्सना आजचा दिवस चांगला जाईल. आज तुम्हाला मोठी ऑनलाइन ऑर्डर मिळू शकते.

**कन्या :** स्पर्धा परीक्षांची तयारी करणाजया विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक तयारी करावी; त्यांना लवकरच चांगले गुण मिळतील. कामाच्या ठिकाणी फोनचा वापर मर्यादित करा, अन्यथा तुमची प्रतिमा डागाळू शकते.

**तुळ :** आज तुमचे आरोग्य तंदुरुस्त राहील. तुमच्या सर्व समस्या दूर होतील. कापड व्यापाजयांना आज त्यांच्या मेहनतीचा फायदा होईल. महिलांना दिवस खूप छान जाईल. टेन्शनमधून मुक्त व्हाल.

**वृश्चिक :** आज व्यावसायिक एखाद्या महत्त्वाच्या बैठकीला उपस्थित राहू शकता. उधार घेतलेले पैस परत कराल, योजनांनुसार सर्वकाही चालत राहिल्याने, तुमचे मन तुमच्या कामावर केंद्रित राहील.

**धनु :** तुमची आर्थिक परिस्थिती खूप मजबूत होईल. सगळं मनासारखं घडेल. तुमचे पालकही आज पूर्ण पाठिंबा देतील. आज तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करण्याचा विचार करू शकता.

**मकर :** दीर्घ काळापासून सुरू असलेल्या समस्या आज सुटतील. ज्यामुळे तुम्हाला आनंद मिळेल. कुटुंबात धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन केले जाऊ शकते. काही सकारात्मक बदल करण्याचा प्रयत्न करा.

**कुंभ :** आज, तुम्ही तुमच्या नातेवाईकाला उधार दिलेल्या पैशाची परतफेड तुम्हाला मिळेल. तुम्ही ते तुमच्या नियोजित प्रयत्नांसाठी वापराल. मीडिया क्षेत्रातील लोकांना आज चांगला नफा मिळेल.

**मीन :** आज खूप ताजेतवाने वाटेल, ज्यामुळे तुम्ही तुमची सर्व कामे वेळेवर पूर्ण करू शकाल. आज, मित्रांच्या मदतीने, तुम्हाला उत्पन्नाच्या संधी मिळतील ज्यामुळे तुम्हाला फायदा होईल.

# पाणीपुरीसाठी रस्त्यात बसकण!



पाणीपुरी सर्वांचाच आवडता प्रकार. आवडत्या ठिकाणाची पाणीपुरी खाण्यासाठी अनेकजण लांबपर्यंत जातात; पण नुकताच याच पाणीपुरीवरून राडा झाला आहे. हा किस्सा वाचून तुम्ही डोक्यालाच हात लावाल. पाणीपुरीवरून रस्त्यात राडा झाल्याची ही घटना गुजरातमध्ये घडली आहे. वडोदरा येथे घडलेल्या या घटनेमुळे पोलिस आणि प्रवाशांचा चांगलाच गोंधळ उडाला.

एका महिलेने सूरसागर तलावाजवळ रस्त्यावर चक्क आंदोलन केले, तेही पाणीपुरीसाठी! झाले असे की, पाणीपुरीच्या स्टॉलवर दोन पाणीपुरी कमी दिल्याने एक महिला नाराज झाली होती. त्याचा निषेध नोंदवत ती चक्क रस्त्यावर बसली आणि संपूर्ण वाहतूकच ठप्प झाली. तिला वीस रुपयांमध्ये सहाऐवजी फक्त चार पाणीपुरी देण्यात आल्या. त्यामुळे ती नाराज झाली. तिने पाणीपुरी विक्रेत्याला उरलेल्या दोन पुऱ्या देण्यास सांगितले; पण तिची मागणी काही पूर्ण झाली नाही. ते पाहून ती एवढी नाराज झाली, की एखाद्या लहान मुलासारखी रस्त्यावर फतकल मारून रडू लागली. तिच्या या निषेधामुळे लोक तर पाहू लागलेच; पण काही वेळातच रस्त्यावर वाहनांची लांब रांग लागली आणि संपूर्ण रस्ता अडवला गेला.

या घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी महिलेला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, पण ती ऐकायला तयार नव्हती. रडत रडत तिने पोलिसांना सगळे सांगितले आणि म्हणाली, 'हा पाणीपुरी विक्रेता सर्वांना सहा पुऱ्या देतो; पण त्याने मला दोन कमी दिल्या आहेत. एकतर मला आणखी दोन पुऱ्या द्या नाहीतर त्याचे दुकान येथून काढून टाका.' पाणीपुरीच्या दोन पुऱ्यांवरून सुरू असलेले हे नाटक बराच वेळ चालले. अखेर बऱ्याच प्रयत्नांनंतर पोलिसांनी महिलेला तेथून निघून जाण्यास भाग पाडले आणि वाहतूक कोंडी दूर झाली. या घटनेची संपूर्ण शहरात चर्चा झाली. अनोख्या निषेधावर लोकांना हसू आवरत नव्हते. ती महिला म्हणाली, 'तो मला दरवेळी कमी पुऱ्या देतो. तो नेहमीच दादागिरी करतो. खरेतर तो वीस रुपयांना सहा पुऱ्या देतो; पण मला मात्र दरवेळी कमी पुऱ्या देतो. तो नेहमी माझ्याशी भांडत असतो. त्याची गाडी आता बंदच केली पाहिजे. आता त्याची गाडी इथे नकोच' असे म्हणत महिलेने हेका कायम ठेवला.

कॅलिडोस्कोप


# मंदिरात नाही मूर्ती




भारतात एक असं मंदिर आहे, जिथे देवीची मूर्ती नसून केवळ तिच्या ओठांची पूजा केली जाते. हे ऐकून अनेकांना आश्चर्य वाटेल; परंतु ही वस्तुस्थिती असून इथे दरवर्षी हजारो भक्त दर्शनासाठी येतात. भारतातील मंदिरे आपापल्या परंपरा, श्रद्धा आणि अनोख्या रितीरिवाजांमुळे प्रसिद्ध आहेत. बहुतांश ठिकाणी देवतेची मूर्ती स्थापित केलेली असते आणि भक्त तिची पूजा-अर्चा करतात. हे मंदिर असेच असून एका डोंगराच्या कड्यावर वसलेले आहे. मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी सहाशे पायऱ्या चढाव्या लागतात. मंदिर गुहेसारख्या संरचनेत बांधले गेले आहे आणि भक्तांना आत जाऊन देवीचे दर्शन घ्यावे लागते. पौराणिक कथेनुसार, सतीचा देह हातात घेऊन भगवान शंकराने तांडव सुरू केलं. त्या वेळी भगवान विष्णूंनी सुदर्शन चक्राने सतीचं शरीर ५१ तुकड्यांत विभागलं. हे अवयव वेगवेगळ्या ठिकाणी पडले आणि त्या प्रत्येक ठिकाणी शक्तिपीठांची स्थापना झाली. असं मानलं जातं, की या शक्तिपीठामध्ये देवी सतीचे ओठ पडले होते. त्यामुळे इथे मूर्ती नसून फक्त ओठांचे प्रतीक मानून देवीची पूजा केली जाते. हे मंदिर राजस्थानमधील माउंट आबू येथे असलेलं अधर देवी मंदिर हे आहे. त एक अद्वितीय शक्तिपीठ मानले जाते. भक्त येथे माता दुर्गेच्या ओठांचे दर्शन घेतात आणि तिला लाल चुनरी, सिंदूर तसेच सौंदर्यवर्धक वस्तू अर्पण करतात. ओठ हे सौंदर्याचे आणि कोमलतेचे प्रतीक मानले जाते. विशेषतः नवरात्रीत येथे भक्तांची प्रचंड गर्दी होते. लोकांचा विश्वास आहे की या मंदिरात दर्शन घेणाऱ्याला वाणीची शक्ती प्राप्त होते. भक्त मनोभावे मागतात, ते देवीच्या कृपेने पूर्ण होतं. विशेष म्हणजे इथे दरवर्षी अनेक कलाकार, गायक आणि वक्ते येऊन आशीर्वाद घेतात. हे मंदिर केवळ धार्मिक स्थळ नसून श्रद्धेचं आणि परंपरेचं अद्वितीय उदाहरण आहे. माता दुर्गे चे ओठ इथे शक्तिस्वरूप मानले जातात आणि भक्त मनोभावे पूजा करतात. त्यामुळे हे मंदिर शक्तिपीठांच्या यादीतील सर्वांत खास आणि रहस्यमय स्थळांपैकी एक मानलं जातं.

# दोन जिव्हा असणारा प्राणी !

तुम्ही सिंह, अस्वल, मांजर, बिबट्या, हरीण आणि माकडे अशा अनेक प्राण्यांबद्दल ऐकले असेल; परंतु दोन जीभ असणाऱ्या लेमरबद्दल ऐकलं नसेल. हा प्राणी सहसा गटात राहतो, दिसायला माकडासारखा दिसतो; पण तो माकड नाही. मोठ्या, तेजस्वी डोळ्यांसह लांब शेपटी, ओले नाक आणि सपाट नखे असणारा हा प्राणी मादागास्कर



बेटावर आढळतो.

लेमरच्या अनेक प्रजाती असल्या तरी ते भारतातील प्राणीसंग्रहालयातच दिसू शकतात. हा दोन जीभ असणारा एकमेव प्राणी आहे. असे मानले जाते की लेमरची एक जीभ दाखवण्यासाठी असते आणि दुसरी खाण्यासाठी. लेमर एक जीभ खाण्यासाठी आणि पिण्यासाठी वापरतात, तर दुसरी त्वचेची काळजी घेण्यासाठी वापरली जाते.

लेमरची दुय्यम जीभ कंगव्यासारखी असते. ते त्यांच्या शरीरातील अशुद्धता काढून टाकण्यासाठी तिचा वापर करतात. दुय्यम जीभ प्राथमिक जिभेच्या अगदी खाली असते. या प्राण्यांना गटात राहणे आवडते. ते झाडांमध्ये राहतात. फळे, पाने आणि कीटक खातात. ते पृथ्वीवरील सर्वात जास्त काळ जगणारे प्राइमेट आहेत. मानवांप्रमाणेच प्राइमेट्सना हात, बोटे आणि अंगठे असतात. ते बुद्धिमान असतात. काही लेमरचे पाय अत्यंत शक्तिशाली असतात. त्यामुळे ते झाडांवरून उडी मारण्यात पारंगत असतात. सर्वात मोठ्या लेमरचा आवाज मोठा, तीक्ष्ण असतो जो खूप दूरवरून ऐकू येतो. 'आय-आय' प्रजातीतील लेमरची बोटे आणि डोळे मोठे असतात. त्यामुळे ते रात्रीदेखील अन्न शोधू शकतात.

# सगळे खंड एक झाले तर...

या पृथ्वीवर सात खंड आणि पाच महासागर आहेत. आपला भारत आशिया खंडात आहे. यासोबतच युरोप, उत्तर आणि दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका अंटार्क्टिका हे खंडही आहेत. आशिया खंडातून युरोपमध्ये जायचं असेल तर विमानप्रवास करावा लागतो. हे सगळे खंड एकमेकांपासून बरेच लांब आहेत. अंटार्क्टिकावर जाण्याचा तर आपण विचारही करू शकत नाही. पण भविष्यात हे सगळे खंड एकमेकांशी जोडले जाणार आहेत. म्हणजेच या पृथ्वीतलावर एकच खंड असेल. या घटनेला 'पैंजिया प्रॉक्सिमा' असं नाव देण्यात आलं आहे. सगळे खंड एकमेकांशी जोडले गेले तर ऑस्ट्रेलियातून अमेरिकेतल्या अलास्का प्रांतात अगदी सहज जाता येईल. इतकंच नाही, तर युरोपमधल्या स्कँडेनेव्हियामधून दक्षिण अमेरिकेतल्या पॅटागोनियापर्यंत तुम्ही चालत जाऊ शकाल.



अर्थात हे सगळं व्हायला अजून बरीच वर्षं आहेत. तब्बल २५ कोटी वर्षांनंतर सगळे खंड एकमेकांशी जोडले जातील. आजपासून साधारण पाच कोटी वर्षांनंतर ऑस्ट्रेलिया दक्षिण-पूर्व आशियाच्या जवळ येईल. याच पद्धतीने आफ्रिका खंड युरोपच्या जवळ जाईल. या काळात अटलांटिक महासागराचा आवाकाही बराच वाढलेला असेल, असं ख्रिस्तोफर स्कॉटीज या शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. पृथ्वीच्या पोटात खडकांची हालचाल सुरू असते. पृथ्वीच्या पोटातल्या मोठाल्या दगडांच्या हालचालींमुळेच सर्व खंड एक होणार आहेत. या दगडांच्या सरकण्याच्या गतीवरून साधारण २५ कोटी वर्षांनंतर सर्व खंड एक झालेले असतील, असा अंदाज शास्त्रज्ञांनी वर्तवला आहे. अर्थात २५ कोटी वर्षांनंतर ही पृथ्वी कशी असेल याचा आपण फक्त अंदाजच बांधू शकतो!




# क्यूआर कोडवर भीक, दररोज दोन हजारांची कमाई

रस्त्यावर, मंदिरात किंवा रेल्वे स्टेशनवर अनेक भिकारी तुम्ही पाहिले असतील. त्यांच्या अंगावर फाटलेले कपडे असतात, हातात रिकामी वाटी घेऊन ते पैसे मागताना दिसतात. केविलवाणी अवस्था पाहून अनेकांना दया येते; पण तुम्ही कधी ऑनलाइन भीक मागणारा भिकारी पाहिला आहे का? होय, असा एक भिकारी आहे जो यूट्यूबवर लाइव्ह येऊन भीक मागतो. या ऑनलाइन भिकाऱ्याचे नाव आहे गौतम सूर्य. आतापर्यंत गौतमने त्याच्या चॅनेलवर तीन हजार आठशे व्हिडीओ अपलोड केले आहेत. त्याच्या या व्हिडीओला एकूण २६ कोटींहून अधिक व्ह्यूज मिळाले आहेत. गौतम सूर्य दररोज तीन-चार तास लाइव्ह येतो आणि स्क्रीनवर दोन-तीन कोड लावून लोकांकडून पैसे मागतो. त्याच्या चॅनेलच्या बायोमध्ये लिहिले आहे, की एक दिवस मी माझे घर नक्की बांधेन, मग कोणीही मला इथून निघ जा असे म्हणणार नाही. विशेष बाब म्हणजे तो कोणालाही फॉलो करत नाही, फक्त त्याच्या दुसऱ्या चॅनेललाच फॉलो करतो. आतापर्यंत त्याचे व्हिडीओ २६ कोटींहून अधिक वेळा पाहिले गेले आहेत. तो लाइव्ह येतो तेव्हा एका वेळी दहा हजारांहून अधिक लोक त्याच्याशी जोडले जातात. लाइव्ह पाहताना लोक त्याला क्यूआर कोडद्वारे एक रुपयापासून शंभर रुपयांपर्यंत पेमेंट करतात. बहुतांश लोक त्याला एक रुपया पाठवतात. कोणी पेमेंट करतो, तेव्हा तो त्या व्यक्तीचे नाव घेऊन 'थँक्यू' म्हणतो आणि कोणत्या नंबरवरून किंवा नावाने पैसे आले ते सांगतो. गौतम दररोज किमान हजार रुपये कमावतो.

# पाण्याच्या एका थेंबातून वीजनिर्मिती

जगात सतत नवनवे शोध लागत असतात. वाढत्या लोकसंख्येला वीज, पाणी, इंधन यांची कमतरता भासणार आहे. वीज कमी पडत असल्यामुळे भारनियमनाची वेळ येते. विजेची ही वाढती गरज भागवण्यासाठी पवन ऊर्जा, सौर ऊर्जा अशा अक्षय्य ऊर्जेचा वापर होतो. हाँगकाँग विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी असाच एक अनोखा शोध लावला आहे. त्यांनी एक जनरेटर तयार केला आहे. हा जनरेटर पावसाच्या पाण्याच्या फक्त एका थेंबाने १०० एलईडी बल्ब प्रकाशित करू शकतो. पाण्याचा एक थेंब १०० एलईडी बल्ब कशा प्रकारे प्रकाशित करू शकतो, असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. हे ऐकून कोणाच्याही भुवया उंचावतील. पण हे खरं आहे. या शोधाबद्दल शास्त्रज्ञांचं कौतुक करावं तेवढं कमी आहे. 'नेचर' या




जगप्रसिध्द जर्नलमध्ये हा शोध प्रकाशित झाला आहे. या जनरेटरच्या माध्यमातून १५ सेंटीमीटर उंचीवरून पाण्याच्या १०० मायक्रोलीटरच्या थेंबाद्वारे १४० वॉल्ट ऊर्जेची निर्मिती होऊ शकते. हाँगकाँग विद्यापीठातले शास्त्रज्ञ अनेक वर्षांपासून या मुद्द्यावर काम करत होते. आता त्यांच्या प्रयत्नांना यश आलं आहे. या जनरेटरची क्षमता प्रचंड असल्याचं बोललं जात आहे. हा जनरेटर आपल्या क्षमतेपेक्षा अधिक ऊर्जेची निर्मिती करू शकतो. त्यामळे विजेची कमतरता दूर होऊ शकते. संपूर्ण जगाला या संशोधनाचा लाभ होऊ शकतो. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात हा शोध खूपच लाभदायी ठरू शकतो.


# गावाबाहेरचं शहर

भारतातल्या एखाद्या शहरात जाण्यासाठी आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडावी लागली तर... आपल्याच देशातलं एखादं शहर दुसऱ्याच देशात असेल तर... असं कसं होऊ शकतं, हा प्रश्न उपस्थित होणं अगदी स्वाभाविक आहे. पण अमेरिकेच्या एका शहरात जाण्यासाठी लोकांना कॅनडामधून जावं लागतं. आहे ना गंमत! पॉईंट्स रॉबर्टस असं या शहराचं नाव आहे. या शहराचं नाव बऱ्याचजणांची ऐकलंही नसेल. हे शहर अमेरिकेचा भाग असलं तरी ते अमेरिकेत नाही. हे शहर अमेरिकेपासून खूप लांब आहे. इथे जाण्यासाठी अमेरिकन लोकांनाच आंतरराष्ट्रीय सीमा पार करावी लागते. पॉईंट्स रॉबर्टसला अमेरिकेचं पेने-एक्सक्लेव्ह असं म्हटलं जातं. खाजगी विमान किंवा बोटीतून येणारी लोकं सोडल्यास अमेरिकन लोकांनाही कॅनडामार्गे या शहरात यावं लागतं. पॉईंट्स रॉबर्टस हा भाग एखाद्या गावासारखाच आहे. २०१० च्या जनगणनेनुसार इथे १३०० लोक राहतात. अमेरिकेने या शहरात काही साक्षीदारांना वसवल्याचं म्हटलं जातं. बरेच लोक नव्या ओळखीनिशी इथे वावरतात. पॉईंट्स रॉबर्टसला विमान किंवा बोटीनेही जाता येतं. अमेरिकन लोक गाडीनेही या शहरात जाऊ शकतात. मात्र गाडीने जाणाऱ्यांना दोन वेळा आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडावी लागते. गाडीने जाणाऱ्यांना आधी कॅनडात जावं लागतं. मग कॅनडातून पॉईंट्स रॉबर्टसला जाताना पुन्हा सीमा ओलांडावी लागते. इथल्या लोकांसाठी बरेच नियम बनवण्यात आले आहेत. इथल्या रहिवाश्यांना अख्खा टोमॅटो नेता येत नाही. पण ते चिरलेला टोमॅटो नेऊ शकतात. अमेरिकेतल्या शेतांमध्ये कीड, रोगराई पसरू नये, यासाठी हा नियम करण्यात आल्याचं बोललं जातं.




# महती गुरूची

गुरू हा आपल्या सौरमालेतला सर्वात मोठा ग्रह आहे. गुरूचा संबंध बऱ्याच धार्मिक घटनांशी जोडला जातो. ज्युपिटर ही रोमन देवता. या देवतेच्या नावावरूनच गुरूला ज्युपिटर हे नाव देण्यात आलं आहे. गुरू ग्रहाच्या वातावरणातले ढग केशरी आणि भुऱ्या रंगाचे असतात. हे ढग अमोनियाचे स्फटिक आणि अमोनियम हायड्रो सल्फाइटपासून बनलेले असल्यामुळे त्यांचा रंग वेगळा दिसतो. गुरू ग्रहावर प्रचंड गुरूत्वाकर्षण आहे. याच कारणामुळे ब्रह्मांडातल्या बऱ्याच उल्का पृथ्वी किंवा इतर ग्रहांऐवजी गुरू ग्रहाकडे ओढल्या जातात. या ग्रहावरचा एक दिवस फक्त नऊ तास आणि ५५ मिनिटांचा असतो. गुरूला सूर्याभोवती प्रदक्षिणा घालायला ३३३ दिवस लागतात. गुरूचं एक वर्ष म्हणजे पृथ्वीवरची ११.९ वर्षं. गेल्या ३५५ वर्षांपासून या ग्रहावर एक भयंकर वादळ घोंघावत आहे. या वादळाचा जोर अद्यापही कमी झालेला नाही. खगोलशास्त्रज्ञ या वादळावर बरंच संशोधन करत आहेत. हे वादळ लांबून एखाद्या लाल ठिपक्यासारखं दिसतं. त्यामुळे त्याला 'द ग्रेट रेड स्पॉट' असं म्हटलं जातं. १६६५ मध्ये गुरूवरचं हे वादळ पहिल्यांदा दिसलं होतं. १८३० मध्येही हे वादळ टिकून होतं. मात्र या वादळामागचं रहस्य अद्यापही उलगडलेलं नाही. गुरूचे एक, दोन नाही तर तब्बल ७९ चंद्र म्हणजे उपग्रह आहेत. गुरू सूर्यापासून बराच लांब असल्यामुळे इथलं वातावरण थंड असतं. गुरू ग्रहावरचं सरासरी तापमान उणे १४८ अंश इतकं असतं. तर अशा या गुरू ग्रहाबद्दल खगोल शास्त्रज्ञांना खूप कुतुहल वाटतं.



# 'पूर' किंवा 'बाद' मागील कारण काय?







बरेचदा शहरांच्या नावांच्या शेवटी 'पूर' किंवा 'बाद' असे लिहिलेले आढळते. नागपूर, सोलापूर, कानपूर, बदलापूर या भारतातील प्रमुख शहरांच्या नावातही 'पूर' या शब्दाचा उल्लेख आढळतो. हैदराबाद, गाझियाबाद, अहमदाबाद ही काही भारतातील प्रमुख शहरे आहेत, ज्यांच्या नावाच्या शेवटी 'बाद' आहे. मात्र शहराच्या नावाच्या शेवटी 'पूर' किंवा 'बाद' का लिहितात? असा प्रश्न अनेकांना पडला असेल. भारतात अशी अनेक शहरे आणि गावे आहेत, ज्यांच्या नावाच्या शेवटी पूर असे लिहिलेले असते. पूर हा शब्द संस्कृत भाषेतून आलेला आहे. या शब्दाचा अर्थ शहर किंवा किल्ला. हा शब्द प्राचीन काळापासून वापरला जात आहे. हस्तिनापूरसारख्या प्राचीन शहरांच्या नावाचा उल्लेख आहेच. जुन्या काळातील अनेक राजे शहरांची नावे देताना पूर हा शब्द जोडत असत. भावी पिढ्यांना त्यांच्या राजांची नावे लक्षात राहावीत, यासाठी राजाच्या नावासमोर पूर असे जोडले जात असे. याच कारणामुळे राजा जयसिंग यांनी आपल्या शहराचे नाव जयपूर असे ठेवले असल्याचे बोलले जाते. भारतात गाझियाबाद, अहमदाबाद, फिरोजाबाद, पाकिस्तानात इस्लामाबाद अशा नावांची शहरे आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे बाद हा शब्द 'आबाद' या शब्दाचा अपभ्रंश आहे. 'आबाद' हा पर्शियन शब्द आहे, त्यात 'आब' म्हणजे पाणी. हा शब्द जमीन किंवा ठिकाण दर्शवतो. याच कारणामुळे अनेक शहरांच्या नावाच्या शेवटी बाद असे लिहिलेले आहे. बऱ्याच वेळा अनेक राजे आपल्या नावाच्या शेवटी बाद असे जोडून ते नाव शहराला द्यायचे. फिरोजाबादचे नाव फिरोजशाहच्या नावावरून ठेवण्यात आले. १४११ मध्ये सुलतान अहमद शाहने आपल्या नावावरून शहराचे नाव 'अहमदाबाद' असे ठेवले होते.

## नागपूरच्या माजी पोलीस आयुक्तांची
# ३ कोटींनी फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
शहराचे माजी पोलीस आयुक्त राहिलेले अंकूश धनविजय यांना अंधारात ठेवत त्यांची बनावट स्वाक्षरी करून विकासकाने निवासी क्षेत्रात आलेली चार एकर शेत जमीन मातीमोल दरांत बळकावली. त्या बदल्यात प्रस्ताव दिलेल्या थ्री बीएचकेच्या सदनिकेचा ताबाही माजी पोलीस आयुक्तांना दिला नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

२८ सप्टेंबर २०२५ हिंगणा उप निबंधकाचे कार्यालय गाठल्यानंतर माजी पोलीस आयुक्तांना या फसवणूकीचा उलगडा झाला. त्यानंतर लगेच माजी पोलीस आयुक्त धनविजय यांनी बिल्डर प्रविण वालदे विरोधात तक्रार दाखल केली. त्या आधारे पोलिसांनी बनावटगिरी आणि फसवणूक प्रकणात गुन्हा दाखल केला.

शहराचे माजी पोलीस आयुक्त राहिलेले अंकूश धनविजय यांनी मुलीला बक्षिस म्हणून १० हजार चौरस फुटाची जमिन दिली होती. तिच्या विक्री प्रकरणात धनविजय यांची बिल्डर वालदेशी सर्वांत प्रथम तोंड ओळख झाली. त्या ओळखीतून वालदेने धनविजय यांच्या नावावर असलेल्या ४ एकर शेत जमिनीची माहिती मिळवली.

दरम्यान वालदेने १० ऑक्टोबर २०२२ ला धनविजय यांचे नाव वापरत भाग नकाशासाठी नागपूर सुधार प्रन्यासकडे अर्ज केला. तो करताना वालदेने धनविजय यांची बनावट स्वाक्षरी आणि चुकीचा ई मेल पत्ता आणि स्वतःचा मोबाईल क्रमांक जोडला. सोबतच धनविजय यांच्या पोलीस आयुक्त कार्यकाळातील जुना पत्ताही वापरला. त्यामुळे धनविजय अंधारात राहिले.

दरम्यान आपली जमीन नवीन विकास आराखड्यात आल्याची कोणतीही माहिती धनविजय यांच्यापर्यंत पोचलीच नाही. मात्र वालदेने धनविजय यांच्याशी व्यवहार करताना तिच्या रेडी रेकनर्समध्ये वाढ झाल्याचे दडवून ठेवले.

दरम्यान वालदेने बाजारभावानुसार धनविजय यांच्या शेत जमिनीची किंमत ३६ लाख रुपये असल्याचे दाखवले. त्या बदल्यात धनविजय यांना वालदेने जमिनीच्या बदल्यात वर्धा मार्गावर तीन बी एच के सदनिकेचा प्रस्ताव दिला.

मात्र वालदेने जमिनीच्या बदल्यात त्यांना अद्याप सदनिकेचा ताबा दिला नाही. त्याने निवासी क्षेत्रात आलेली शेतजमीनही बनावटगिरी करत हडपली. दरम्यान धनविजय यांनी २८ सप्टेंबरला उप निबंधक कार्यालय गाठत प्रमाणित प्रत मिळवली.

तिथे धनविजय यांना वालदेने बनावटगिरी करत फसवणूक केल्याचा प्रकार लक्षात आला. त्या आधारे धनविजय यांनी वालदे विरोधात बनावटगिरी आणि फसवणूकीची तक्रार. दिली. त्या आधारे पोलिसांनी बिल्डर वालदे विरोधात गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू आहे.

# ५००१ अंड्यांची भुर्जी बनवून रचला विश्वविक्रम




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १२ :
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, भारतीय कुक्कुट विज्ञान संघटना आणि राष्ट्रीय अंडी समन्वय समिती यांच्या सहकार्याने ५००१ अंडी वापरून अंडा भुर्जी तयार करण्याचा विक्रम आज नोंदवण्यात आला. प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर ही भुर्जी तयार केली.

हा कार्यक्रम रविवारी सकाळी ८ वाजता नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर येथे पार पडला. यावेळी साडेतीन हजार लोक सहभागी झाले होते. पाककृतीनंतर उपस्थितांना ह्यअंडा भुर्जीह्व पावासोबत खाण्याची संधी मिळाली. विष्णू मनोहर यांचा हा तिसावा विश्वविक्रम आहे. भुर्जी बनवून झाल्यानंतर त्यांना या संदर्भातील प्रमाणपत्र हे देण्यात आले.

फेब्रुवारी २०२५ पर्यंत महाराष्ट्रात १.८ लाखांहून अधिक कुपोषित मुले असल्याची नोंद आहे. त्यापैकी ३० हजारांहून अधिक मुले गंभीर तीव्र कुपोषित म्हणून आणि सुमारे १.५१ लाख मुले मध्यम तीव्र कुपोषित म्हणून वर्गीकृत आहे. कुपोषणाचा सामना करण्याचा एक प्रभावी मार्ग म्हणजे नियमित अंडी खाणे हा आहे. ज्याला पूर्ण अन्न म्हणून ओळखले जाते, असा दावा महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाने केला.

नागपूर येथील महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाने जून २०२४ ते सप्टेंबर २०२५ दरम्यान अंडी जागरूकता मोहिमा आणि त्यासंबंधित शैक्षणिक कार्यक्रमांची मालिका यशस्वीरित्या आयोजित केली होती. ज्यामध्ये अंड्यांच्या पौष्टिक आणि आर्थिक मूल्यावर प्रकाश टाकण्यात आला.

तंदुरुस्ती का फंडाः रोज एक अंडा या लोकप्रिय ओळींअंतर्गत शाळा आणि गावांमध्ये अठ्ठावीसहून अधिक जागरूकता कार्यक्रम घेण्यात आले. नियमित सेवनाला प्रोत्साहन देण्यासाठी उकडलेले अंडे वाटप करण्यात आले, अशी माहिती बोंडे यांनी दिली. यावेळी माफसूच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या उपक्रमाबद्दल कुलगुरूंनी सांगितले.

**अंड्यामधील गुणधर्म**

सुमारे ५५ ग्रॅम वजनाच्या एका अंड्यामध्ये अंदाजे ७२-७८ कॅलरीज, ६.३ ग्रॅम उच्च-गुणवत्तेचे प्रथिने आणि ५ ग्रॅम चरबी असते. तसेच १८६ मिलीग्रॅम कोलेस्ट्रॉल, ०.६ ग्रॅम काबोर्हायड्रेट्स आणि ६२ मिलीग्रॅम सोडियम असते. हे कॅल्शियम (२५ मिग्रॅ), फॉस्फरस (९५ मिग्रॅ), पोटॅशियम (६५ मिग्रॅ), आणि लोह (०.९ मिग्रॅ) सारख्या आवश्यक खनिजांचा स्रोत आहे आणि व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन डी, डी, व्हिटॅमिन बी१२ आणि फोलेटसह जीवनसत्त्वे देखील आहेत. तर मेंदूच्या आरोग्यास समर्थन देणारे कोलीनने (१४७ मिग्रॅ) विशेषतः समृद्ध आहे.

इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (आयसीएमआर) अंतर्गत कार्यरत असलेल्या हैदराबाद येथील राष्ट्रीय पोषण संस्थेने (एनआयएन) प्रतिव्यक्ती वषार्ला किमान १५३ अंडी अंड्यांची आहारात समावेश शिफारस केल्याची माहितीही बोंडे यांनी दिली.

## भरधाव ट्रक उलटून दोन मजूर ठार




■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १२ :
जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील टुणकी (तालुका संग्रामपूर) गावाजवळ मजुरांना घेऊन जाणारे मालवाहू वाहन (आयशर ट्रक) भरवेगात उलटले. या उलटलेल्या वाहनाखाली दबून दोन मजूरांचा जागीच मृत्यू झाला तर पाच मजूर गंभीर जखमी झाले. हे मजूर अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तालुक्यातील रहिवासी असल्याचे सांगितले जात आहे.

केळी घेऊन जाणारे हे मालवाहू वाहन काल शनिवारी रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास अपघातग्रस्त झाले. यात दोन मजूरांचा आयशर खाली दबून करुण अंत झाला. तसेच पाच मजूर गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. केळीने भरलेला आयशर ट्रक बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद ते अकोट रस्त्याने मजूरांना घेऊन अंजनगावकडे जात होता. टुणकी गावाजवळ या आयशर वाहन चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. सर्व मजूर अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव गावातील असल्याचे सांगितले जात आहे.

सोनाळा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थ आणि जेसीबीच्या मदतीने सर्व मजूरांना बाहेर काढण्यात आले.

## अमरावती विद्यापीठाचे अकोल्यात उपकेंद्र

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १२ :
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोला येथे सुरू करण्याच्या कार्यवाहीसाठी तीन सदस्यीय समिती नेमण्यात येणार आहे. समितीने उपकेंद्रासाठी योग्य जागेची पाहणी करून सविस्तर आराखडा सादर करावा,ह्ण असे निर्देश वजा सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या आहेत.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उप केंद्र अकोला येथे सुरू करण्यासाठी मंत्रालयात बैठक झाली. पाटील यांनी आराखडा व अन्य कार्यवाहीच्या अनुषंगाने तीन अधिकाऱ्यांच्या समितीकडून अहवाल मागितला आहे.

# ट्रॅव्हल्सचे तिकीट दर तिप्पट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १२ :
नागपूर ते पुणे या प्रवासाचे एरव्ही ८०० ते १२०० रूपयांपर्यंत असलेले भाडे दिवाळीच्या तोंडावर ४ हजाराच्या आसपास गेले आहे. दिवाळीच्या काळातील वाढती गर्दी पाहता ट्रॅव्हल्स बसेस संचालकांनी भरमसाठ दरवाढ केली असून, परिवहन विभाग किंवा शासन गप्प बसले आहे.



नागपूर येथून राज्य आणि जवळच्या प्रांतात ट्रॅव्हल्स बसेस धावतात. सर्वाधिक ट्रॅव्हल्स पूणे मार्गावर धावत असून, बस भाडे साधारणतः ८०० ते १२०० रूपये इतके आकारले जाते. परंतु, दिवाळीची गर्दी पाहता ९ ऑक्टोबरपासून प्रचंड भाडेवाढ करण्यात आली असून, पुणे ते नागपूर प्रवासाचे भाडे ४ हजारावर गेले आहे. प्रवाशांची मोठी लूट होत असली तरी कोणताही विभाग कारवाई करण्यास तयार नाही.


## सचिन तेंडुलकरचा इनसाइट-ड्रिव्हन स्पोर्ट्सवेअर ब्रँड, टेन एक्स यू लाँच




सचिन तेंडुलकर, कार्तिक गुरुमूर्ती आणि करण अरोरा यांनी सह-स्थापना केलेल्या SRT10 ॲथलीझर प्रायव्हेट लिमिटेड अंतर्गत अंतर्दृष्टी-नेतृत्वाखालील क्रीडा आणि ॲथलीझर ब्रँड, TEN ७ डव ने त्याच्या अधिकृत लाँचची घोषणा केली.

सचिन तेंडुलकरच्या २४ वर्षांच्या जमिनीवरील खेळाच्या अनुभवावर आणि खेळाडूंच्या गरजांबद्दलच्या त्यांच्या सखोल समजुतीवर आधारित, TEN ७ डव विचारशील डिझाइन, जागतिक मानके आणि भारतीय पाय आणि शरीरासाठी खरोखर बनवलेल्या आरामदायी उत्पादनांवर अतुलनीय लक्ष केंद्रित करते.

TEN ७ डव गियर स्टोरीटेलिंग झोन आणि इंटरॅक्टिव्ह उत्पादन चाचण्यांपासून ते स्पष्ट कंटेंट स्पेसपर्यंत, प्रत्येक टचपॉइंट क्रीडा संस्कृतीतील ब्रँडच्या खोलवर असलेल्या मुळांना अधोरेखित करण्यासाठी तयार करण्यात आला होता. उपस्थितांनी डिझाइन प्रक्रिया आणि कामगिरीवर लक्ष केंद्रित करण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला, तर क्रिकेट इकोसिस्टम, खेळाडू, प्रशिक्षक आणि उत्साही लोकांच्या प्रामाणिक आवाजांनी दहा ७ या विश्वासाला बळकटी दिली. लाँच प्रसंगी बोलताना, TEN ७ OU चे सह-संस्थापक आणि मुख्य प्रेरणा अधिकारी सचिन तेंडुलकर म्हणाले, अरुंद गल्लीपासून ते सर्वात मोठ्या मैदानांपर्यंत आणि गावातील मैदानांपासून ते मोठ्या शहरातील स्टेडियमपर्यंत, एक गोष्ट कधीही बदलत नाही खेळामुळे मिळणारे हास्य आणि आनंद. लहानपणी, मी खेळांचा पुरेपूर आनंद घेतला, सर्व प्रकारच्या हवामानात, ऊन आणि पावसात खेळत होतो.

भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी मैदानावर उतरताना मला प्रत्येक वेळी एक साधा आनंद जाणवायचा आणि ती भावना माझ्यासोबत आहे. आजपर्यंत माझ्या दुसऱ्या डावातही. भारताला खेळप्रेमी राष्ट्रातून खेळ खेळणाऱ्या राष्ट्रात जाताना पाहणे, खेळणे, प्रशिक्षण देणे आणि मला मिळालेला आनंद अनुभवणे हे माझे स्वप्न आहे!

उपस्थितांनी प्रत्येक शूमध्ये जाणारे तंत्रज्ञान आणि कारागिरी एक्सप्लोर केली, ज्यामध्ये भारतीय खेळपट्टूयांवर स्थिरता आणि पकड वाढविण्यासाठी सचिन तेंडुलकरने डिझाइन केलेले अतिरिक्त स्पाइक वैशिष्ट्य यासारख्या तपशीलांचा समावेश आहे. ■ ■ ■

## एचडीएफसी लाइफचे महालक्ष्मी स्टेशनवर ब्रांडिंग



मुंबईच्या मेट्रो लाइन ३ वर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आता महालक्ष्मी मेट्रो स्टेशनजवळ येताच ओळखीचे नाव पाहायला मिळेल, ते म्हणजे एचडीएफसी लाइफ. मुंबईतील महालक्ष्मी येथे मुख्यालय असलेल्या एचडीएफसी लाइफला महालक्ष्मी मेट्रो स्टेशनसोबत सहयोग करण्याचा अभिमान वाटतो.

नवीन बसवण्यात आलेली मेट्रो लाईन ३ ही शहराच्या वाढत्या नेटवर्कचा एक भाग आहे आणि महालक्ष्मी मेट्रो स्टेशन हे ३३.५ किमी लांबीच्या कफ परेड ते आरे जेव्हीएलआर कॉरिडॉरवरील एक प्रमुख ट्रान्झिट हब बनण्यास सज्ज आहे. भारतातील आघाडीची जीवन वीमा कंपनी एचडीएफसी लाइफने २५ वर्षांपूर्वी आर्थिक सुरक्षिततेचा प्रवास सुरू केला.

हा प्रवास प्रवाशांच्या प्रवासाप्रमाणेच आहे, जे दररोज मेट्रोने प्रवास करत त्यांच्या गंतव्यांपर्यंत पोहोचतात, तसेच महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याचा आणि स्वतःचे व आपल्या प्रियजनांचे भविष्य घडवण्याचा व सुरक्षित करण्याचा प्रयत्न करतात.

एचडीएफसी लाइफ महालक्ष्मी मेट्रो स्टेशनच्या उद्घाटनाबाबत मत व्यक्त करत एचडीएफसी लाइफच्या व्यवस्थापकीय संचालिका व मुख्य कार्यकारी अधिकारी विभा पडळकर म्हणाल्या, एचडीएफसी लाइफने वर्ष २००० मध्ये मुंबई शहरामधून जीवन विमा कंपनी म्हणून आपला प्रवास सुरू केला.

गेल्या २५ वर्षांमध्ये आम्ही देशभरातील लाखो पॉलिसीधारकांना विमाकृत केले आहे, त्यांना आर्थिकदृष्ट्या संरक्षण दिले आहे, तसेच त्यांना अभिमानासह जीवनाचा त्यांचा प्रवास सुरू ठेवण्यास सक्षम केले आहे. या सोहळ्याला नेमबाज अंजली भागवत प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. ■ ■ ■

## मिडवेस्टने ४५१ कोटी रुपये उभारण्यासाठी निश्चित केला आयपीओ किंमत बँड

ब्लॅक गॅलेक्सी आणि ॲब्सोल्युट ब्लॅक ग्रॅनाइटचे भारतातील सर्वात मोठे उत्पादक असलेल्या क्वाट्र्ज प्रोसेसर मिडवेस्ट लिमिटेडने ४५१ कोटी रुपये उभारण्यासाठी त्यांच्या आगामी प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग (आयपीओ) साठी प्रति शेअर १,०१४-१,०६५ रुपये किंमत बँड निश्चित केला आहे.

नैसर्गिक दगड उद्योगात चार दशकांहून अधिक काळ काम करून, कंपनीने ग्रॅनाइटच्या पलीकडे क्वाट्र्ज प्रक्रियेपर्यंत विस्तार केला आहे, जो तिच्या फेज कप्लांटद्वारे इंजिनिअर केलेल्या दगड आणि सौर काचेच्या विभागांना सेवा देत आहे. ते जड खनिज वाळू शोध (रुटाइल आणि इल्मेनाइट सारख्या टायटॅनियम फीडस्टॉक उत्पन्न देणारे साहित्य) तसेच दुर्मिळ पृथ्वी घटकांच्या (आरईई) प्रक्रियेत आणखी विविधता आणत आहे. हा आयपीओ १५ ऑक्टोबर रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि १७ ऑक्टोबर रोजी बंद होईल, अँकर बुक १४ ऑक्टोबर रोजी उघडेल आणि २४ ऑक्टोबर रोजी सूचीबद्ध होणारे शेअर्स असतील.

आयपीओमध्ये २५० कोटी रुपयांचा नवीन इश्यू आणि २०१ कोटी रुपयांचा विक्रीचा प्रस्ताव आहे. या नवीन इश्यूमधून १३०.३ कोटी रुपये उपकंपनी मिडवेस्ट निओस्टोन अंतर्गत क्वाट्र्ज सुविधेच्या दुसऱ्या टप्प्यातील विस्तारासाठी, २५.७ कोटी रुपये इलेक्ट्रिक डंप ट्रकसाठी आणि ३.२ कोटी रुपये सौर ऊर्जा एकत्रीकरणासाठी वापरले जातील. ■ ■

## युके व भारत सर्जनशीलता आणि नवोपक्रमात नैसर्गिक भागीदार




'युके -भारत क्रिएटिव्ह कॉरिडॉरची उभारणीः जागतिक सर्जनशील अर्थव्यवस्थेसाठी सह-उत्पादन, कौशल्ये आणि नवोपक्रम' या विषयावरील उच्चस्तरीय गोलमेज परिषदेसह 'वङ-भारत क्रिएटिव्ह कॉरिडॉर २०२५' च्या रौप्य महोत्सवी आवृत्तीत युनायटेड किंग्डम आणि भारत यांच्यातील सर्जनशील भागीदारी केंद्रस्थानी आली. फिक्की फ्रेम 2025 मध्ये UK शिष्टमंडळाचा सहभाग हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून ८-९ ऑक्टोबर रोजी युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान सर केयर स्टारमर यांच्या भारत भेटीचा एक भाग होता. या वर्षाच्या सुरुवातीला भारत-यूके व्यापक आर्थिक आणि व्यापार करार वर स्वाक्षरी आणि भारत-यूके व्हिजन २०३५ स्वीकारल्यानंतर ही भेट झाली.या परिषदेत बोलताना दक्षिण आशियासाठी व्यापार आयुक्त आणि पश्चिम भारतातील ब्रिटिश उप-उच्चायुक्त हर्जींदर काग म्हणाले, युके आणि भारत सर्जनशीलता आणि नवोपक्रमात नैसर्गिक भागीदार आहेत.

आमचे सहकार्य सिनेमा आणि डिझाइन ते गेमिंग आणि तल्लीन कथाकथनापर्यंत पसरलेले आहे. फिक्की फ्रेम २०२५ मध्ये भाग घेतल्याने सह-निर्मिती, प्रतिभेची देवाणघेवाण आणि जागतिक प्रभावाला समर्थन देणारा एक दोलायमान सर्जनशील कॉरिडॉर तयार करण्याच्या आमच्या सामायिक वचनबद्धतेला बळकटी मिळते. व्यापक आर्थिक आणि व्यापार करार आणि आमच्या सामायिक भारत-यूके व्हिजन २०३५ च्या अलिकडेच झालेल्या स्वाक्षरीवरून दिसून येते की, सर्जनशील अर्थव्यवस्था संधींचा आणि आपल्या दोन्ही राष्ट्रांमधील समजुतीचा पूल बनत राहील. ■ ■ ■ ■


: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com





**येथून पुढे,**
बँका त्याच दिवशी धनादेश वटवतील/परत करतील. ग्राहकांना त्याच दिवशी क्रेडिट मिळेल.

**3 जानेवारी 2026 पासून,**
बँका 3 तासांच्या आत धनादेश वटवतील/परत करतील. ग्राहकांना काही तासांत क्रेडिट मिळेल.

**याचा अर्थ काय?**
- पैशांची जलद उपलब्धता
- अधिक चांगली सुविधा
- विलंब कमी होईल

**याची नोंद घ्यावी**
- धनादेश बाउन्स होणे टाळण्यासाठी खात्यात पुरेशी शिल्लक ठेवा




अधिक माहितीसाठी, तुमच्या बँकेशी संपर्क साधा किंवा आरबीआयची दिनांक 13 ऑगस्ट 2025 ची अधिसूचना पहा.
अभिप्राय देण्यासाठी rbikehtahai@rbi.org.in येथे लिहा
क्यूआर कोड स्कॅन करा
अधिकृत व्हाट्सॲप क्र. 99990 41935 / 99309 91935

जनहितार्थ जारी द्वारा
भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in